# कृषीवल

रायगड ॥ सोमवार, दिनांक ११ एप्रिल २०२२

किंमत ४ ₹


## जिल्ह्यात शून्य कोरोना रुग्ण ४६ रुग्णांवर उपचार सुरू

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।** रायगड जिल्ह्यात रविवार दि. १० एप्रिल रोजी कोरोनाच्या एकही नव्या रुग्णाची नोंद झाली नसल्याने तसेच सुदैवाने उपचारादरम्यान एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नसल्याने दिलासा मिळाला आहे. सद्यस्थितीत ४६ रुग्णांवर उपचार सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.आतापर्यंत रायगड जिल्ह्यातील एकूण कोरोना बाधित रुग्णांची संख्या २ लाख १५ हजार ३१९ झाली आहे. यापैकी २ लाख १० हजार ५७५ रुग्ण कोरोनातून बरे झाले आहेत. तर मृतांचा आकडा ४ हजार ६९८ वर गेला आहे.

### महत्त्वाचे

#### भारतीय विद्यार्थ्याची कॅनडात हत्या

**टोरोंटो :** कॅनडात टोरोंटो येथे एका २१ वर्षीय भारतीय विद्यार्थ्यांची एका अज्ञात हल्लेखोराने गोळ्या घालून हत्या केली. येथील भुयारी रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारापाशी ही घटना घडली. कार्तिक वासुदेव असे या मृत विद्यार्थ्यांचे नाव असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, गंभीर जखमांमुळे त्याचा मृत्यू झाला. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी या हत्येविषयी शोक प्रकट केला.

#### आ.सुरेश धस यांच्यावर गुन्हा

**बीड :** भाजपचे आ.सुरेश धस यांना औरंगाबाद खंडपीठाने चांगलाच दणका दिला आहे. त्यांच्यासह ३८ जणांवर दरोड्याचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आठ महिन्यांपूर्वी दाखल झालेल्या गुन्ह्यात ३९५ कलम वाढवण्याच्या आदेशाने धसांच्या अडचणीत वाढ झाली आहे. आष्टी तालुक्यातील मनोज चौधरी यांच्या पत्नी, माधुरी चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ८ महिन्यांपूर्वी आमदार सुरेश धस यांच्यासह ३८ जणांवर आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

#### ए.आर. रेहमान यांचे तमिळला समर्थन

**चेन्नई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विविध राज्यांतील नागरिकांनी परस्परांशी इंग्रजीऐवजी हिंदीत संवाद साधावा, असे आवाहन केले होते. त्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध संगीतकार ए. आर. रेहमान यांनी नोन्मणियम सुंदरम पिल्लई यांनी लिहिलेल्या व एम.एस. विश्वनाथन यांनी संगीतबद्ध केलेल्या तमिळनाडू गीताच्या ओळींसह तमिळ देवतेचे चित्र समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केले. तमिळ कवी भारतीदासन यांच्या थामिलियक्क या काव्यसंग्रहातील प्रिय तमिळ भाषा हे आमच्या अस्तित्वाचे मूळ आहे. या ओळीही रेहमान यांनी यासोबत दिल्या आहेत. तामिळी नागरिकांनी याचे समर्थन केले.

## सिल्व्हर ओक हल्ला प्रकरण

# हल्लेखोर कर्मचाऱ्यांना दणका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**राष्ट्रवादीचे अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानावर हल्ला करणाऱ्या १०९ कर्मचाऱ्यांना एसटीची नोकरी गमवावी लागणार आहे. तशी घोषणाच परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांनी केली आहे. घरातील आंदोलनात ज्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल झाले त्यांना सेवेत घेणार नाही, अशी घोषणा सरकारकडून करण्यात आली आहे.**

**109 जणांच्या नोकरीवर गदा**

यासंदर्भात माहिती देताना परिवहन मंत्री अनिल परब यांनी म्हटलं आहे की, येत्या २२ तारखेपर्यंत कामावर रुजू होण्याचे आदेश कोर्टाचे आहेत. २२ तारखेपर्यंत जे कामगार रुजू होतील त्यांच्यावर कुठलीही कारवाई केली जाणार नाही. •➤ पान २ वर

### अधिकाऱ्याची उचलबांगडी

**या हल्ल्याच्या तपासादरम्यान काही वेगवान हालचाली घडत असताना आता गावदेवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजभर यांनाही हटवण्यात आले आहे. याआधी या घटनेनंतर पोलीस उपायुक्त योगेशकुमार गुप्ता यांची बदली करण्यात आली होती. या मोर्चाची माहिती मीडियाला मिळाली. मात्र पोलिसांना याची खबर का नव्हती, असा प्रश्न अजित पवारांनी उपस्थित केला. पोलिसांची भूमिका संशयित असल्याचे आरोप होत आहे. आज सहआयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेतली. या दरम्यान संबंधित कारवाई झाली आहे.**

# पुन्हा टेन्शन वाढले

### महाराष्ट्राला केंद्राचा अलर्ट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र , दिल्ली , हरयाणा, केरळ आणि मिझोराम या पाच राज्यांत पुन्हा एकदा कोरोना रुग्णसंख्या वाढत असल्याचे लक्षात घेत केंद्र सरकारने या पाचही राज्यांसाठी अलर्ट जारी केला आहे. स्थितीचा आढावा घेऊन योग्य ती पावले उचलण्याचे निर्देश केंद्राने या राज्यांना दिले आहेत.

देशातील कोरोना संसर्गाची तिसरी लाट ओसरली आहे. रुग्णसंख्येत मोठी घट झाल्याने महाराष्ट्रासह अनेक •➤ पान २ वर

### सावधान, तो पुन्हा येतोय

**नवी दिल्ली :** कोरोना विषाणू अजून गेलेला नाही. तो पुन्हा येत आहे. तो लोकांना साथीच्या रोगाविरुद्ध लढा सुरू ठेवण्याचा इशारा देत आहे. हा बहुरूपिया कोरोना पुन्हा कधी उगवेल हे कोणालाच माहीत नाही. त्याचा प्रसार नियंत्रित करण्यासाठी लसींचे सुमारे १८५ कोटी डोस दिले गेले आहेत.

जनतेच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

रविवारी (दि.१०) गुजरातमधील जुनागढ जिल्ह्यातील माँ उमिया धामच्या कार्यक्रमाला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबोधित करताना मोदींनी माँ उमियाच्या भक्तांना रासायनिक खतांच्या विळख्यातून पृथ्वी मातेला वाचवण्याच्या उद्देशाने नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. कोरोना हे एक मोठे संकट होते. आम्ही असे •➤ पान २ वर

# विकासकामांच्या माध्यमातून वेश्वीचा चेहरामोहरा बदलणार

## आ.जयंत पाटील यांचे प्रतिपादन

### अलिबागेत आता सात मजली इमारत

**अलिबाग शहरासाठी सरकारकडून २ एफएसआय मंजूर करण्यात आपण यशस्वी झालेलो आहोत.त्यामुळे अलिबागसारख्या ठिकाणी आता कुणालाही सात मजल्यापर्यंत इमारती बांधणे शक्य होणार आहे.**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

विकासकामांच्या माध्यमातून वेश्वी गाव आणि परिसराचा चेहरामोहरा बदलण्याचा शेकापचा नेहमीच प्रयत्न राहिला असून, भविष्यातही तीच भूमिका घेऊन आम्ही काम करणार आहोत, असे प्रतिपादन शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यानी केले.

वेश्वी, वाडगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा प्रारंभ आ. जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी उपस्थितांसमोर संवाद साधला. यावेळी जयंत पाटील यांच्या हस्ते नेहुली येथील गणेश विसर्जन घाटाचे नुतनीकरण, वाडगाव येथे सार्वजनिक •➤ पान २ वर

> अलिबाग-विरार कॉरिडॉर पूर्ण झाल्यावर त्याचा मोठा फायदा अलिबाग तालुक्याला होणार आहे. यासाठी त्याचे नियोजन आतापासूनच करावे,
> – आ. जयंत पाटील

# भाजपला सोडलंय, हिंदुत्व नाही

**। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।**

शिवसेनेने भाजपला सोडलंय पण हिंदुत्व सोडलेले नाही, अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी भाजपवर जोरदार प्रहार केला.

कोल्हापूर शहर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचारामुळे कोल्हापुरातील राजकीय वातावरण तापलं असून महाविकास आघाडीच्या उमेदवार जयश्री जाधव यांच्या प्रचारानिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आरोपांना आक्रमक प्रत्युत्तर देत भाजपचा चांगलाच समाचार घेतला.

विरोधकांवर खोटेनाटे आरोप करून आपलं घोडं पुढे सरकतंय का हे बघायचं, अशी भाजपची सवय झाली आहे. आम्ही कामात कमी पडत नाही, आपत्ती आली तर मदतीला धावून जाण्यात कमी पडत नाही, पण खोटं बोलणार नाही, असा टोला मुख्यमंत्र्यांनी भाजपला लगावला आहे.

**॥ मुख्यमंत्र्यांचा भाजपवर प्रहार**

**॥ कोल्हापुर निवडणुकीसाठी ऑनलाईन प्रचारसभा**

> भाजप नेते जर कुस्ती खेळण्यासाठी मैदानात उतरले तर ते आधी पैलवानांच्या घरी धाडी टाकतील, कारण समोरून वार करण्याची हिंमत त्यांच्यात नाही.
> – उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

### पडळकरांचे बंधू अपघातात जखमी

**। सांगली । वृत्तसंस्था ।**

भाजपचे आ. गोपीचंद पडळकर यांचे मोठे बंधू सांगली जिल्हा परिषद सदस्य ब्रह्मानंद पडळकर यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला. यामध्ये ब्रह्मानंद पडळकर यांच्यासह तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. विटा -कुंडल रोडवर हा अपघात झाला. एका कार्यकर्त्यांच्या मुलीच्या साखरपुड्यासाठी जात असताना मालवाहू टेम्पो आणि पडळकर यांच्या गाडीचा समोरासमोर अपघात झाला.

# गुहागरच्या दोन पर्यटकांना जीवदान

## अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील घटना

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

गुहागर येथील अलिबाग समुद्र किनारी कुलाबा किल्ला पाहून भरतीच्या पाण्यातून परतत असताना बुडत असताना बीचवरील जीव रक्षकांनी प्राणाची बाजी लावत त्यांचे प्राण वाचवले. अलिबाग बीच वर रविवारी सायंकाळी ५ वाजता गुहागर येथून आलेले पर्यटक

हरीओम कुमार, साहेद कुमार हे दोघे आले होते. ते कुलाबा किल्ला पाहण्यासाठी पाण्यातून गेले होते. मात्र परत येत •➤ पान २ वर

### अपघातात महिलेचा मृत्यू

**। खोपोली । वार्ताहर।**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर बोरघाट येथे सायमाळजवळ मोटारसायकल अपघात झाला. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून मृत महिलेचे नाव स्नेहा सातदिवे असे आहे तर, यातील पुरुषाची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना खोपोली नगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

## राम जन्मला ग सखे...

■ श्रीराम नवमीनिमित्त अलिबाग मधील ब्राह्मण उत्कर्ष मंडळाच्या वतीने कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय कीर्तनकार उदयबुवा फडके यांनी श्रीराम जन्मोत्सव सोहळा कीर्तनातून सादर केला.

# पाकमध्ये उलथापालथ

## इम्रानचा डाव खल्लास

**। इस्लामाबाद । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानमध्ये नव्या सरकारची तयारी जोरात सुरू आहे. विरोधी पक्षांनी शहबाज शरीफ यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून उमेदवारी दिल्याचे वृत्त आहे. पाकिस्तानच्या नव्या वझीर-ए-आझमचा निर्णय सोमवारी होणार आहे.

इम्रान खान सत्तेतून बाहेर पडल्यानंतर शरीफ यांनी ट्विटद्वारे मीडिया, वकिलांचे आभार मानले होते. इम्रानविरोधातील अविश्वास ठराव रविवारी मंजूर करण्यात आला. १७४ खासदारांनी त्यांच्या विरोधात मतदान केले.

रविवारी विरोधी पक्षांनी संयुक्त विरोधी उमेदवार म्हणून पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाझचे शाहबाज शरीफ यांचे नाव दिले. शाहबाज हे पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांचे भाऊ आहेत.

अविश्वास प्रस्ताव टाळण्याच्या अनेक प्रयत्नांनंतर पाकिस्तानच्या नॅशनल संसदेमध्ये मध्यरात्री मतदान झाले. यावेळी ३४२ सदस्यांच्या सभागृहात १७४ सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले. पाकिस्तानमध्ये कार्यकाळ पूर्ण न करता पंतप्रधानपद गमावण्याची घटना नवीन नसली तरी अविश्वास प्रस्तावाद्वारे पायउतार होणारे इम्रान पहिलेच पंतप्रधान आहेत.

शनिवारी रात्री उशिरा पाकिस्तान राष्ट्रीय संसदेत इम्रान खान सरकारविरोधातील अविश्वास प्रस्तावावर मतदान होण्यापूर्वी संसदेचे सभापती, उपसभापतींनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. यानंतर रात्री १२ वाजून ४० मिनिटांनी अविश्वास प्रस्तावावर मतदान झाले. इम्रान खान सरकारविरोधात १७४ मते पडली.

### नवाझ शरीफ परतणार

*इम्रान खान सरकार कोसळल्यानंतर आता लवकरच माजी पंतप्रधान नवाझ शरीफ हे पाकिस्तानमध्ये परत येणार आहेत. मागील काही वर्ष त्यांचे वास्तव्य इंग्लंडमध्ये होते. मागील आठवड्यातच नवाझ शरीफ यांच्यावर लंडनमध्ये हल्ला करण्याचा प्रयत्न झाला होता. हा हल्ला इम्रान खान यांच्या समर्थकाने केल्याचा दावा त्यांनी केला होता.*


कृषीवल हळदी कुंकू

SMART RAIGAD BAZAR

दिवस मानाचा सौभाग्याचा...!

स्मार्ट रायगड बाजार अलिबाग प्रायोजित

लकी ड्रॉ निकाल

अलिबाग

प्रथम क्रमांक : ३०८१ (शेगडी)
द्वितीय क्रमांक : ३१२२ (कुलर)
तृतीय क्रमांक : ३१९२ (ओव्हन)
चतुर्थ क्रमांक : ३०२४ (वॉटर प्युरीफायर)
पाचवे क्रमांक : ३२५३ (इस्त्री)

खालापूर

प्रथम क्रमांक : ३४५२ (मिक्सर)
द्वितीय क्रमांक : ३४८४ (फॅन)
तृतीय क्रमांक : ३४७५ (इस्त्री)

अलिबाग येथील निकालाचे बक्षिस सोमवार ते शुक्रवार या दिवशी कृषीवल कार्यालय वेश्वी येथून सकाळी ११ वा. ते सांय. ५ वा. घेऊन जाणे.

खालापूर येथील निकालाचे बक्षिस सोमवार ते शुक्रवार शेकाप कार्यालय खालापूर येथून सकाळी ११ वा. ते सांय. ५ वा. घेऊन जाणे.

टिप :- बक्षिस घेण्यासाठी येताना आपले कुपन बरोबर घेऊन येणे.

## अनधिकृत मोबाईल टॉवर्सकडे

# प्रशासनाचा कानाडोळा

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील पोशीर येथील अनधिकृत जाहीर करण्यात आलेल्या मोबाईल टॉवरबाबत कारवाई करण्यास व या प्रकरणी अहवाल सादर करण्यास कर्जत तहसीलदार यांनी अक्षम्य दिरंगाई केली आहे. तर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आलेल्या आदेशांवर कार्यवाही करण्याऐवजी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे एक प्रकारे या अनधिकृत मोबाईल टॉवरवर कर्जत तहसीलदारांचीच कृपा असल्याचे दिसून येत आहे.

पोशीर येथील इंडस टॉवर लिमिटेड कंपनीचा मोबाईल टॉवर उभारणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात असतानाच तहसीलदार यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आलेली होती. या टॉवरला बेकायदेशीर नाहरकत देणारे पोशीर ग्रामपंचायत प्रशासन या ग्रामपंचायतीच्या अक्षम्य प्रशासकीय चूका व दिरंगाई निदर्शनास आणूनदेखील अहवालात नमूद न करणारे कर्जत पंचायत समिती प्रशासन आणि विनापरवानगी अनधिकृत टॉवर उभारणी सुरु असताना ती थांबविण्यास सक्षम असतानाही काम न थांबवणारे कर्जत तहसील प्रशासन यांनी या प्रकरणाचे अक्षरशः लोणचे घातले आहे. कर्जत तहसीलदार यांच्याकडे प्रकरण दाखल होऊन २७ जुलै २०२१रोजी शेवटची सुनावणी झालेली होती. त्यानंतर तब्बल तीन महिन्यांनी तहसीलदार यांनी टॉवर अनधिकृत असल्याचा निर्णय दिला. तोवर या टॉवरची सिग्नल यंत्रणा कार्यान्वित झालेली होती. १० नोव्हेंबर २०२१ रोजी निर्णय दिल्यानंतर पुन्हा साडेचार महिन्यांचा कालावधी लोटला तरी

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष

कारवाई झालेली नाही. सदर टॉवर निष्कासित करणेबाबत तक्रारदार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केला. या प्रकरणी जिल्हाधिकारी यांचे आदेश असतानाही तहसीलदार कर्जत यांनी कारवाई केली नाही व अहवालही पाठवला नाही.

### कारवाईचा अंधा कानून पॅटर्न

या प्रकरणी एमआरटीपी ॲक्ट कलम ५६ अ नुसार अर्ज दाखल झाल्यावर मंडळ अधिकारी कळंब यांनी टॉवरचा विद्युत पुरवठा बंद करून टॉवर सील केल्याचा अहवाल दिला मात्र प्रत्यक्षात टॉवर सुरूच राहिल्याने हा कारवाईचा देखावा.

त्यामुळे तक्रारदार कांता हाबळे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५३ नुसार कारवाईसाठी अर्ज दाखल केला. मात्र या अनधिकृत टॉवरप्रकरणी तहसीलदार कर्जत यांचे अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त न झाल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २ मार्च २०२२ रोजी पुन्हा लेखी आदेश दिले आहेत मात्र अहवाल सादर करण्यास दिरंगाई सुरु आहे.

सदर प्रकरणी अनधिकृत बांधकामावर कारवाई न करता दुर्लक्ष केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम ५६ नुसार कारवाईसाठी दोन्हीं कार्यालयांकडे अर्ज दाखल असून या प्रकरणी चौकशीकरीता आलेल्या अर्जावर तहसिलदार यांनी अहवाल सादर करण्याऐवजी आपण सक्षम अधिकारी नसल्याचा शेरा मारून अर्ज निकाली काढला आहे मात्र

तसेच अर्जदार यांनी टॉवरबाबत कारवाई पूर्ण न करता चुकीचा अहवाल दिल्याबद्दल मंडळ अधिकारी कळंब यांच्यावर कलम ५६ अ नुसार कारवाई व्हावी अशी लेखी मागणी करण्यात आलेली आहे. पण या प्रकरणी महसूल विभागाचे अधिकारी अडचणीत येणार असल्याने अहवाल देण्यास टाळाटाळ सुरू आहे.

## पनवेल श्रीरामजन्मोत्सव सोहळा उत्साहात

**। पनवेल । वार्ताहर ।**

रामनवमीच्या निमित्ताने रविवारी पनवेलच्या चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजाच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महिला मंडळाच्या वतीने वैशाली कुलकर्णी, नीलिमा वैद्य, वैशाली वैद्य, उज्वल दिघे, प्रतिभा हजरनीस, सानिका पत्की, गौरी राजे, नीलिमा गडकरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुश्राव्य गीते सादर केली. संस्थेच्या नवीन कुमार, रुचिता सिन्हा आणि विजय सिन्हा यांनी प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन चंद्रसेनिय कायस्था प्रभू समाज, पनवेल यांचा गौरव केला. यावेळी अध्यक्ष योगेश राजे, सुप्रसिद्ध उद्योजक राजुशेठ गुप्ते, उपाध्यक्ष नितीन देशमुख, सचिव गिरीश गडकरी, खजिनदार श्रीकृष्ण चित्रे, सहसचिव संदीप देशमुख, सुप्रसिद्ध उद्योजक राजाभाऊ गुप्ते, प्रदीप गुप्ते आदी मान्यवर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुरुडमध्ये मंदिरावर विद्युत रोषणाई

**। आगरदांडा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील एकदरा ग्रामपंचायत हद्दीतील श्रीराम मंदिरात ५९ वा श्रीरामजन्मोउत्सव उत्सवात साजरा करण्यात आला. येथील श्रीराम मंदिरात भाविकांनी गर्दी केली होती. अनेकांनी पूजा, प्रार्थना करत श्रीरामचे उत्सवानिमित्त दर्शन घेतले.

मंदिर परिसरात विद्युतरोषणाई करण्यात आली होती. सरपंच रामकृष्ण आगरकर यांच्या हस्ते श्रीरामाची चांदीची मुर्तीची विधीवत पूजा करण्यात आली. त्यानंतर श्रीरामला पाळण्यात घालुन अंगाई गीत गाण्यात आले. महाप्रसादाची सोय

करण्यात आली होती. माणगाव येथील परशुराम उपाध्ये यांनी किर्तनात श्रीराम जन्मोत्सव गाऊन सर्वांना मोहीत केले. मुरूड तालुक्यातील पंचक्रोशीत भागातील असंख्य श्रीराम भक्त हजर होते. धनुर्धारी महादेव कोळी समाज एकदरा- महिला मंडळ व मुंबई मंडळाच्या वतीने हा उत्सव साजरा करण्याकरिता मेहनत घेतली.

## भाकरवडला भजन व कीर्तन

**। भाकरवड । वार्ताहर ।**

भाकरवड येथे रविवारी श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. स्व शंकर चांगु पाटील , व स्व नीरा शंकर पाटील यांनी उभारण्यात आलेल्या प्रभु श्रीराम मंदिरात विविध आध्यत्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी विद्याधर महाराज यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. यानिमित्त गेले आठवडाभर प्रमोद जुईकर यानी ग्रंथवाचन केले. माऊली हरिपाठ मंडळ देहेन पंचक्रोशी यांचे भजन आयोजित करण्यात आले होते. या जन्मोत्सव कार्यक्रमात गाव परिसरातील जवळ जवळ पाचशे हुन आदिक संत मंडळी प्रभू श्रीचे दर्शन घेतले.

**अभीष्टचिंतन**
**ज्येष्ठ नागरिकांचे**

**११ एप्रिल**

१) श्री. नारायण कडवे
सारळ, अलिबाग
११-०४-१९४४

**म / ह / त्त्वा / चे**

### शब्द संवाद अंकासाठी साहित्य पाठवा

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरातील जनसंवाद प्रकाशनच्या माध्यमातून शब्द संवाद हा दिवाळी अंक प्रथमच प्रकाशित केला जाणार आहे. शब्द संवाद दिवाळी २०२२ चा पहिलाच अंक देशातील कष्टकरी, कष्टकरी महिला, मजूर या घटकातून वेगळेपण जपत आपला ठसा विविध क्षेत्रात उमटवलेल्या व्यक्तींसाठी असणार आहे. सोबत कथा, कविता, चारोळी, आणि लघु साहित्य पाठवायचे असेल त्यांनी देखील आपले साहित्य त्वरित पाठवून द्यावे. दिवाळी अंकाला पानांची मर्यादा लक्षात घेवून ठराविक साहित्याला या पहिल्या दिवाळी अंकात प्रसिद्धी दिली जाईल. आपले साहित्य navjansanwadyahoo.com या इमेल वर किंवा ९०२८७००४८४ या व्हॉटसअप क्रमांकावर पाठवून द्यावे.

## कानसईमध्ये शाळापूर्व तयारी उपक्रम

**। सुकेळी । वार्ताहर ।**

रायगड जि.प.तर्फे शाळापूर्व तयारी उपक्रमांतर्गत प्राथमिक शाळा कानसई येथे दाखल होणाऱ्या मुलांचे औक्षण करत शाळेत दाखल करून घेण्यात आले.

मुख्याध्यापक बाळासाहेब चिंचोले यांनी पुढाकार घेऊन शाळा पूर्व तयारी उपक्रमांतर्गत या मुलांना प्रभातफेरीकडून त्यांचे औक्षण करून शाळेत दाखल करून घेतले. यावेळी ही मुले नवीन पाहुणे असल्याने त्यांचे गुलाब पुष्प व खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमात निवास पवार, सुमित काते , दिलीप हारपाल यांनी मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तर अमित काते यांनी कार्यक्रमात सर्वांना नाश्ता दिला. कार्यक्रमाला स्थानिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील हारपाल, महेंद्र ढाणे, अजित ढाणे, अंगणवाडी सेविका मानसी ढाणे, शालिनी हारपाल, पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## आदईत साकव कामाचा प्रारंभ

**। पनवेल । वार्ताहर ।**

जिल्हा नियोजन निधीतून पनवेल ग्रामीण भागातील आदई गाव येथे साकव बांधणे (रू. ५ लक्ष) या कामाचा रविवारी रामनवमी दिनी मुहुर्तावर जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कामाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी योगेश तांडेल, ज्ञानेश्वर बडे, दीपक घरत, यतीन देशमुख, राकेश गोवारी, जगदीश शेळके, ज्ञानेश्वर भंडारी, संतोष गोळे, बिपीन झुरे, राजेश वैंगणकर, सतीश गायकर, अविनाश गव्हाणकर, आदई सरपंच रमाकांत गरूडे, माजी उपसरपंच विलास शेळके आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकदरा येथे राम रावणाच्या युद्धाचा जिवंत देखावा

**। मुरूड । वार्ताहर ।**

प्रदीर्घ दोन वर्षाच्या कोरोना कालखंडानंतर मुरुड एकदरा येथील जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या श्रीराम नवमीनिमित्त निघणारी भव्य चलचित्र देखावा मिरवणूक व पालखी सोहळा धनुर्धारी मंडळ एकदरा वतीने आयोजित करण्यात आले होते. हा सोहळा गेले ५९ वर्षे धनुर्धारी मंडळ एकदरा आयोजित करीत आहेत.

या निमित्ताने राम जन्मोत्सवानिमित्त रात्री दहा ते साडे

अकरा च्या दरम्यान कीर्तनकार ह. भ. प. परशुराम हाटे महाराज यांचे सुश्राव्य श्रीराम चरित्रावर कीर्तन सादर करण्यात आले. त्यानंतर रविवा रोजी पहाटे पाच वाजता श्री रामाच्या मूर्तीला अभ्यंगस्नान घालून काकड आरती करण्यात आली. दुपारी दहा वाजून तीस मिनिटांनी श्रीराम मंदिर एकदरा येथे ह. भ. प. परशुराम हाटे महाराजांनी श्रीराम जन्मोत्सव कीर्तन सादर केले. दुपारी १२:४५ वाजता श्री रामाचा जन्म काळ करण्यात आले व विधीवत अभिषेक, पूजा करून श्री रामाच्या मूर्तीला पाळण्यात ठेवून सुवासिनींच्या हस्ते पाळणा घेण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व श्रीराम भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.

सायंकाळी पाच वाजता श्रीरामाच्या पालखी चे आयोजन करण्यात आले पालखीसोबत श्री राम व रावण युद्ध देखावा भव्य मिरवणूक एकदरा गावातून काढण्यात आली यावेळी तालुक्यातील असंख्य भाविकांनी हा सोहळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. ही मिरवणूक एकदरा पुलावरून मुरुड बाजार पेठ, मच्छी मार्केट मार्गे पुन्हा एकदरा गावाकडे येऊन त्याची गावांमध्ये पालखी मिरवणूक फिरवून समारोप करण्यात आले.

## कर्जतमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील अनेक गावांमध्ये श्रीराम मंदिरे आहेत. या मंदिरांमध्ये राम जन्मोत्सवा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे हा उत्सव साजरा करण्यात आला नव्हता त्यामुळे यंदा रामजन्मोत्सव अधिक चांगल्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

तालुक्यातील दहिवली, साळोख, बेंडसे, कडाव, माथेरान, नेरळ कर्जत येथील कपालेश्वर मंदिर आदी ठिकाणी राम नवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दहिवली येथील श्री विठ्ठल संस्थांच्या श्री राम मंदिरातही मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री राम पंचतनच्या मंदिरात पहाटे ब्रह्मचैतन्य उपासना केंद्राच्या सदस्यांनी काकड आरती केली त्यानंतर महापूजा, अभिषेक, रामजन्माचा सोहळा संपन्न होतांना पाळणा, रामरक्षा, रामपाठ झाल्यानंतर श्री रामच्या मूर्तीचे दर्शन प्रत्येक भाविकाला जागेवर नेवून देण्यात आले. कोंकण आळीतील विजय जिनगरे यांच्या निवासस्थानी तर साळोख येथील कृष्णा कदम यांच्या निवासस्थानीसुद्धा रामनवमी उत्सव संपन्न झाला. कडाव येथील श्री बाल दिगंबर गणेश संस्थानच्या श्रीराम मंदिरात श्रीराम पुरोहीत यांनी तीन दिवस प्रवचन सेवा केली.

महाप्रसादानंतर श्रीरामाची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी अध्यक्ष बळवंत घुमरे, सचिव विलास दांडेकर, खजिनदार मनोहर दांडेकर, भालचंद्र घुमरे, सुधीर पोतदार, विलास मुरकुटे, मोहन पोतदार आदींसह दहीवलीकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेंडसे, कडाव, साळोख, माथेरान येथेही रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली.

## अंबा नदीपात्र की डम्पिंग ग्राउंड?

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

जांभुळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील अंबा नदीपात्रात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीपात्रात घाण व कचरा, वाळू उपसा यामुळे नदीचे अस्तित्व देखील धोक्यात आले आहे.

जांभुळपाडा येथे वाहणाऱ्या अंबानदी नदीपात्रात कचरा आणून टाकला जात असल्यामुळे या नद्या आहेत की डंपींग ग्राऊंड हा प्रश्नच पडला आहे. एकीकडे पर्यावरणप्रेमींकडून नद्या वाचविण्यासाठी विविधस्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. परिसरातील नागरिक कचरा

मोठ्या प्रमाणात नदीपात्रात आणून टाकण्यात येत आहे. प्रदूषित करण्यासाठी मोठा हातभार लावला जात आहे. बिनधास्त नदीपात्राचे डंपिंग ग्राऊंड करीत आहेत. नदीपात्रातील मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. कायम दुर्गंधी असते. कचऱ्यासोबतच काटेरी झुडुपे, मोठी झाडे, कॅरिबॅग तसेच दारूच्या बाटल्या ढिग पडलेला आहे. नदीपात्रांमधून कचरा व पाणी प्रदूषित होण्याला नागरिकही तेवढेच जबाबदार आहेत.

## मुख्याधिकारी भणगे यांना पुरस्कार प्रदान

**। खोपोली । वार्ताहर ।**

खालापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांना उत्कृष्ट प्रशासक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्टार महाराष्ट्राची संस्थेकडून हा सन्मान करण्यात आला. कोरोना साथ, निसर्ग चक्रीवादळ आदी काळात केलेले कार्य तसेच खालापूर नगरपंचायत हद्दीत आदिवासी समाजाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेत भणगे यांना यथोचित सन्मान करण्यात आला आहे.

शनिवार दि.१० एप्रिल रोजी पनवेल येथे वासुदेव बळवंत फडके

सभागृहात आयोजित कार्यक्रम मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांना उत्कृष्ट प्रशासक पुरस्काराने सन्मानित केले आहे.

नगरपंचायत हद्दीत कोरोनाचे संक्रमण रोखण्यासाठी आणि कोव्हिड सेंटर उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना मदत केले.

शासकीय योजना राबविण्यासाठी तात्कालीन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांचे मोठे सहकार्य मिळाले असून, सध्या माथेरान नगरपरिषदेत काम करीत असताना जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे सहकार्य मिळत असल्यामुळे निःस्वार्थीपणे शाश्वत कामे करण्यासाठी उर्जा मिळत आहे. अशी प्रतिक्रिया सुरेखा भणगे -शिंदे यांनी व्यक्त केली.

**तळा येथे दर्शनासाठी एकच गर्दी**

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरात रामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील कुरुंड्यात असलेल्या प्रभू श्रीराम, सीता व लक्ष्मणाच्या मंदिरात दर्शनासाठी सकाळपासून भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराच्या बाहेरील परिसरात छोटेखानी यात्रा देखील भरली होती ज्यामध्ये लहानमुलांसाठी विविध प्रकारची खेळणी,पाण्याने भरलेले फुगे,आइस्क्रीम, विविध प्रकारचे खेळ यांसह विविध प्रकारच्या मिठाईंची दुकाने देखील लावण्यात आली होती. रामनवमी पासूनच तळा तालुक्यातील यात्रांना सुरुवात होते.सकाळपासून रात्री उशिरापर्यंत शहरातील तसेच तालुक्यातील भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली होती.

पान १ वरुन

## हल्लेखोर कर्मचाऱ्यांना दणका

या आंदोलनात ज्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत त्यांना सेवेत घेता येणे शक्य नाही. २२ तारखे पर्यंत कामगार कामावर आले नाहीत तर एसटीमध्ये कंत्राटी खासगीकरण ही करता येईल का याचा विचार ही केला जाईल. ५ महिने बंद असलेल्या बस पूर्ववत करण्यासाठी बस अगाराने पूर्ण बसेसची तपासणी केली आहे. एस टी महामंडळ बस सेवा सुरू करण्यासाठी पूर्ण पणे सज्ज आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

## विकासकामांच्या माध्यमातून वेश्वीचा चेहरामोहरा बदलणार

व्यायामशाळेचे उद्घाटन तसेच वेश्वी येथेही सार्वजनिक व्यायामाशाळेचे उद्घाटनाबरोबर ओमकार क्रीडा मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माजी जि.प.सदस्या चित्रा पाटील, सरपंच प्रफुल्ल पाटील, माजी सरपंच आरती पाटील, पं.स.माजी उपसभापती मीनल माळी, माजी सदस्य रचना पाटील ,वेश्वीचे उपसरपंच नंदकुमार कदम, चेंढरे ग्रा.पं.सदस्य अजित माळी, माजी उपसरपंच नरेश पडियार, अरुण पाटील, सुनील गुरव, सुरेंद्र शेळके, सदानंद शेळके, गजानन नाईक, राघव गुरव, मधूकर थळे, सुनील गुरव, अनंत मुळुस्कर यशवंत पाटील, रविद्र पाटील, नाशिकेत कावजी, विष्णू मगर, महादेव जाधव, संदीप घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

आम.जयंत पाटील यांनी आपल्या छोटेखानी भाषणातून प्रफुल्ल पाटील आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतूक केले. आमदारकीच्या काळात वेश्वीतील विविध विकासकामांसाठी आतापर्यंत साडे तीन कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. यातून विविध मुलभूत विकासकामे दर्जेदार पद्धतीने करण्यात वेश्वी ग्रामपंचायत यशस्वी झाल्याबद्दल जयंत पाटील यांनी समाधान व्यक्त केले.

वाढते नागरीकरण लक्षात घेता आता नागरिकांचा ओढा वेश्वी,चेंढरे या ग्रामपंचातीच्या हद्दीत येण्याची शक्यता असल्याने तेथे येणाऱ्या नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्यावर ग्रामपंचायतीने लक्ष केंद्रीत करावे,असे त्यानी सुचित केले. नव्या पिढीनेही असेच दर्जेदार कामे करावीत,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.प्रफुल्ल पाटील यानी सर्वांचे स्वागत केले.

## पुन्हा टेन्शन वाढले

राज्यांनी कोविड विषयक निर्बंध उठवले आहेत. सर्व व्यवहार पूर्वीप्रमाणे सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर परत एकदा दैनंदिन रुणसंख्येत वाढ दिसू लागल्याने धाकधूक निर्माण झाली आहे. यात प्रामुख्याने दिल्ली, हरयाणा, केरळ, महाराष्ट्र आणि मिझोराम या राज्यांत रुग्णवाढ दिसत असून या राज्यांना केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी सतर्क केलं आहे. राजेश भूषण यांनी पाचही राज्यांना पत्र लिहून बदलत असलेल्या स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. कोरोनाचे नवे रुग्ण वाढत आहेत. त्याचा नियमित आढावा घेण्यात यावा. स्थितीवर बारीक लक्ष ठेवतानाच रुग्णवाढ रोखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावी, असे निर्देश राजेश भूषण यांनी पत्राद्वारे दिले आहेत.

## सावधान, तो पुन्हा येतोय

म्हणत नाही की हे संकट संपले आहे. हे एक विराम असू शकते. कोरोना पुन्हा कधी येईल हे आम्हाला माहीत नाही. कोरोनाला रोखण्यासाठी सुमारे १८५ कोटी डोस देण्यात आले आहेत. ज्याने जगाला चकित केले आहे. लोकांच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## गुहागरच्या दोन पर्यटकांना जीवदान

असताना समुद्राच्या पाण्याला भरती आल्याने पाणी वाढले होते. मात्र परत येण्यासाठी ते दोघे पाण्यातून पोहत येवू लागले. मात्र पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. बीच वर असलेल्या जीवरक्षक बंडया सारंग व दिपक ढोले, व कुणाल सारंग यांच्या हा प्रकार लक्षात येताच त्यांनी समुद्रात उड्या मारत त्या दोघांना वाचवले.

## प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे ३० व्या राज्यस्तरीय कामगार कार्यकर्ता शिबीर पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथे सुरू झाले. यावेळी कोविड-१९ च्या महामारी काळामध्ये कामगारांसह कामगारांच्या कुटूंबियांचे रक्षण करणाऱ्या सेवाव्रतींचा हृद्यसत्कार पोलादपूरच्या नगराध्यक्षा सोनल गायकवाड, पंचायत समितीचे उपसभापती शैलेश सलागरे आणि मान्यवरांकडून करण्यात आला.

यावेळी कोकणात आधी मोठ-मोठे उद्योग येऊ द्यात तरच कामगारांच्या हाताला काम मिळेल, असे आवर्जून सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन करणारे महासंघाचे सचिव दिलीपदादा जाधव यांनी कोकणात कारखाना उद्योग होऊ घातला की विरोधाचे हत्यार उपसून आपआपली पाकिटे आणि हप्ते घेण्यास धावलात तर कोकणातील श्रमशक्तीच्या हातांना काम कसे मिळणार, असा सवाल करून राजकीय मानसिकतेचे कान खेचले.

या प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटन समारंभामध्ये व्यासपिठावर पोलादपूरच्या नगराध्यक्षा सोनल गायकवाड, उपसभापती शैलेश सलागरे, तालुका काँग्रेस अध्यक्ष अजय सलागरे, नवयुग विद्यापिठाचे ॲड. रणजितसिंह जाधवराव, निवृत्त न्यायाधिश जी.एस.बज, कविता कानिटकर मॅडम, जीआरआय टॉवर्सचे संचालक रमेश मस्करन्स, एसबी रिशेलर्स ग्रुपचे सुनील शिरगांवकर, फायझरचे संचालक माधव सावरगांवकर, वाकणचे ग्रामपंचायत सदस्य नारायण साने तसेच आदी मान्यवर उपस्थित होते.

# कोल्हारे परिसरात अशुद्ध पाणीपुरवठा

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये नव्याने नागरीकरण झालेल्या वसाहतीसाठी नळाचे पाणी देण्याची ग्रामपंचायतीची योजना आहे. मात्र, नदीमधून ते पाणी उचलून ते पाणी नवीन वसाहत भागात जलवाहिनीमधून वितरित केले जात आहे. दरम्यान, उल्हास नदीमधील हिरवेगार तवंग असलेले पाणी कोल्हारे ग्रामपंचायत साथीचे आजार आणण्यासाठी अशुद्ध पाण्याचा पुरवठा करीत आहे, असा आरोप खुद्द ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांनी केला आहे. ग्रामपंचायतीमधील सत्ताधारी गटाला घरचा आहेर एका ग्रामपंचायत सदस्याने दिला असल्याने कोल्हारे ग्रामपंचायत खरोखर अशुद्ध पाणी देत आहे काय? असा संभ्रम निर्माण झाला आहे.

कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये कोल्हारे, धामोते आणि बोपेले येथे असलेली निवासी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. ग्रामपंचायतीने आपल्या भागातील रहिवाशांना पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी कोल्हारे ग्रामपंचायतीने आर्थिक नियोजन करून जलवाहिन्या टाकल्या आहेत. त्या जलवाहिन्या टाकण्यासाठी तब्बल चार ठिकाणी नेरळ-कळंब रस्ता खोदण्यात आला आहे. काळ्या रंगाच्या रबरी जलवाहिन्या नवीन वसाहत भागात पाणी देण्यासाठी जलवाहिनी टाकण्यात आल्या. परंतु, त्या जलवाहिनीमधून घरोघरी वितरित होणारे पाणी कोणत्या प्रकारचे आहे, याचा अभ्यास लघुपाटबंधारे विभागाने केला आहे काय? असा प्रश्न विजय हजारे यांनी उपस्थित केला आहे.

याबाबत गरमपंचायत सदस्य विजय हजारे यांनी थेट नदीमधून कोणत्या अधिकारात पाणी उचलले जात आहे, याची माहिती पाटबंधारे खात्याने द्यावी, अशी मागणी विजय हजारे यांनी केली आहे.

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

धनेश्वरी येथे उल्हास नदीमधून पाणी उचलण्यात आले आहे. तेथे असलेल्या धामोते नळपाणी योजनेच्या विहिरींमधून ते पाणी जलवाहिनीतून न सोडता थेट नदीमधून उचलून जलवाहिनीमधून घरोघरी पाठवले जात आहे. ज्या उल्हास नदीमधून पाणी उचलले आहे, तिला काही वर्षांपासून जलपर्णी आणि हिरव्या शेवाळीने व्यापले आहे. ते पाणी थेट नवीन वसाहत भागात सोडले जात आहे. त्यात तेथील योजनेत जलशुद्धीकरण केंद्रदेखील नाही आणि त्यामुळे नागरी भागाला अशुद्ध पाण्याचा पुरवठा केला जात आहे. गढूळ आणि अशुद्ध पाण्याचे वितरण करून कोल्हारे ग्रामपंचायत साथीच्या रोगांना निमंत्रण देत आहे, असा आरोप हजारे यांनी केला आहे.

# पनवेलमध्ये पुन्हा हातगाड्यांचा त्रास सुरू

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल उरणनाका ते टपालनाका येथे दररोज २० ते २५ अनधिकृत हातगाड्या लागत आहेत. यामुळे नित्याच्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्याचा नागरिकांना त्रास होत आहे. पुन्हा एकदा शहरात हातगाड्या सुरु झाल्याचे चित्र दिसत आहे. मात्र, महापालिकेचे अतिक्रमण विभाग याकडे बघूनही कारवाई का करत नाही, असा सवाल उपस्थित झाला आहे.

पनवेल शहरात ठिकठिकाणी हातगाडी चालकांनी बस्तान बसविण्यास सुरुवात केली आहे. पनवेल शहराची प्रमुख बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या टपाल नाका येथून उरण नाक्यापर्यंत फळे आणि भाज्या विक्री करणाऱ्या हातगाड्या उभ्या असतात. या गाड्या पुढे उरण नाक्यावर प्रचंड गर्दी करतात. येथेच मच्छी विक्रेते रस्त्यावर बसलेले असतात. रिक्षा थांबादेखील येथेच असल्याने नागरिकांच्या गाड्या रस्त्याच्या दुतर्फा हॉस्पिटलपर्यंत लागलेल्या असतात. त्यामुळे शहरातील या मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी कायम असते. त्यामुळे पुन्हा एकदा पनवेल परिसर बेकायदा हातगाड्यांच्या विळख्यात सापडलेला दिसत आहे. रस्त्यावर पुन्हा एकदा हातगाड्या सुरु झाल्या आहेत. मात्र, अतिक्रमण विरोधी पथक यांच्यावर कारवाई करताना दिसत नसल्याने त्यांचे प्रमाण वाढत आहे. पनवेल महापालिकेची अतिक्रमण विरोधी मोहीम सुस्त झाली असल्याचे यानिमित्ताने दिसत आहे. हातगाड्यांचे शहर ही पुसलेली ओळख पुन्हा पनवेल शहरात डोके वर काढू लागली आहे.

# आ. जयंत पाटील यांची पुगाव येथे सांत्वनपर भेट

**। गोवे-कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील पुगाव गावातील तीन कुटुंबांतील व्यक्तींचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी शनिवार, दि.९ एप्रिल रोजी सांत्वनपर भेट घेतली.

रोहा तालुक्यातील काही दिवसांपूर्वी तसेच आ. जयंत पाटील यांचे हितचिंतक पुगाव येथील नारायण शंकर खामकर, रविकांत सदाशिव शेळके, विमल रामचंद्र देशमुख यांचे आकस्मिक निधन झाले. त्या प्रित्यर्थ या तिन्ही कुटुंबांतील व्यक्तींच्या घरी जाऊन आमदार जयंत पाटील यांनी कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी पुगावचे ज्येष्ठ नेते नारायणराव धनवी, ग्रामपंचायत सदस्य गणेश म्हसकर, बबन म्हसकर, खांब विभागीय नेते मारुती खांडेकर, रोहा तालुका चिटणीस राजेश सानप, माजी सरपंच मनोहर महाबळे, नारायण अधिकारी, जनार्दन खामकर, महादेव खामकर, अनंत खामकर, रुपेश अधिकारी, अनंत धाडसे, विनायक म्हसकर व समस्त पुगाव ग्रामस्थ यांच्यासमवेत उपस्थित होते.

# आगोटीला झाली सुरुवात

## पापड, कुरडया, सांडगे, लोणची, मसाले आदी पदार्थांची जंत्री

**धम्मशील सावंत**
**। पाली/बेणसे ।**

भारतीय खाद्य संस्कृतीत विविध लज्जतदार पदार्थांना विशेष महत्त्व आहे. त्यातच पावसाळ्यातील बेगमीसाठी उन्हाळ्यात करण्यात येणाऱ्या विविध पदार्थांची जंत्रीच आहे. कोरोना काळात मागील दोन वर्षे ही लगबग पाहायला मिळाली नाही. मात्र, आता जिल्ह्यात घराघरात ही लगबग दिसत आहे. तसेच अगोटीलादेखील सुरुवात झाली आहे. बाजारात कडधान्य व सुकी मासळी खरेदीसाठी गर्दी वाढत आहे.

उन्हाळ्यात बहुतांश घरात पापड, कुरडया, चिकोड्या, शेवया, फेण्या, सांडगे, लोणची व मसाले या विविध पदार्थांसह वाळवणाचे पदार्थ सामूहिक व वैयक्तिकपणे तयार केले जातात. पापड, कुरडया, चिकोड्या, मिरगुंड, फणस व आंबा पोळी, मसाले, सांडगी मिरची विविध सरबत आदी पदार्थ तयार करण्यासाठी तर गावागावतील महिला गोळा होतात. याबरोबरच अनेक घरांच्या अंगणात, पडवीत, छतावर, कौलावर किंवा पत्र्यावर कापलेल्या आंब्याच्या फोडी आंबोशी करण्यासाठी ठेवल्या जातात. कोकम सरबत बनविण्यासाठी बाटल्यांमध्ये कोकम ठेवले जाते, ही परंपरा व संस्कृती ठिकठिकाणी अजूनही टिकून आहे.

### खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

पावसाळ्याच्या चार महिन्यांत भाजीपाला व मासळी यांची आवक कमी होते आणि त्यांचे भावदेखील वधारतात. अशा वेळी घरात साठवून ठेवलेले कडधान्य व सुकी मच्छी म्हणजे सर्वात चांगला पर्याय असतो. मासळीची आवक कमी, डिझेल व मजुरीच्या वाढलेल्या दरांमुळे यावर्षी सुक्या मासळीचे भाव वाढले आहेत. तर, कडधान्याचे भावदेखील वाढले आहेत. गोड व कडवे वाल यांना अधिक मागणी आहे. पावासाळ्यासाठी खेड्यापाड्यातील अनेकजण या जिन्नसांची खरेदी करत आहेत. महत्त्वाच्या आठवडा बाजारात खरेदीसाठी लोकांची गर्दी सुरु आहे.

# मुरुड समुद्रकिनारी दोन कासवे मृतावस्थेत

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड समुद्रकिनाऱ्यावर रविवारी सकाळी ग्रीन टर्टल प्रजातीचे दोन मोठी कासवे किनाऱ्यावर फुगलेल्या अवस्थेत आढळली. त्यातील एक विश्राम बागेसमोर, तर दुसरे कासव काही अंतरावर समुद्रकिनाऱ्यावर कुजलेल्या अवस्थेत सापडल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. समुद्रकिनाऱ्यावर सतत कासव मृतावस्थेत सापडणे ही बाब चिंतेची असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत पाटील यांना संपर्क केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.




# नांदगाव येथे रामनवमी उत्साहात

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगावच्या अमृतेश्वर मंदिरात रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पुजारी पांडुरंग गाणार यांच्या हस्ते प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची विधीवत पूजाअर्चा व अभिषेक करण्यात आला.

यावेळी अमृतेश्वर मंदिर पंचकमिटी अध्यक्ष उमाकांत चोरघे, उपाध्यक्ष कुसूमाकर घुमकर, विद्याधर चोरघे, सचिव प्रभाकर निरकर, खजिनदार निरकर गुरुजी, सदस्य विष्णू नागावकर, सचिन पाटील, जितेंद्र भाटकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे औचित्य साधून यावेळी अमृतेश्वर मंदिर पंचकमिटीतर्फे रायगड भूषण पुरस्कार मिळालेल्या कीर्तनकार धनंजय बुवा गद्रे, विद्याधर चोरघे तसेच महेश कोतवाल यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

## संपादकीय

# 'आलू-टमाटर'चा भाव

इम्रान खान सरकारचा अखेर शनिवारी रात्री उशिरा अंत झाला. तसा तो होणार होताच. गेल्या आठवड्यात अविश्वास ठराव चर्चेलाच येऊ न देऊन आपण जणू विरोधकांवर बाजी पलटवली अशा समजात इम्रान होते. पण पाकिस्तानात लोकशाही यंत्रणा किडली असली तरी न्यायालयांमध्ये अजूनही धुगधुगी आहे. यापूर्वी अगदी लष्करशहा मुशर्रफ यांच्याशीही न्यायालयांनी न डगमगता जोरदार लढाई केली होती. विशेष न्यायालयाने तर त्यांना देशद्रोहाच्या खटल्यात फाशीची शिक्षा सुनावली होती. त्यामुळे गेल्या काही काळात पाकिस्तानातील अतिशक्तिशाली लष्करशाही न्यायालयाचा सन्मान ठेवायला शिकली. आतादेखील अनेकांचा भरवसा पाकिस्तानी न्यायालयांवर होता. सर्वोच्च न्यायालयाने ही अपेक्षा पूर्ण केली व इम्रान यांच्या मनसुब्यांना चाप लावला. त्यामुळे शनिवारी पुन्हा नॅशनल असेम्ब्ली भरवून अविश्वास ठरावावर मतदान घेणे भाग पडले. शेवटी पराभव समोर दिसू लागल्यावर इम्रानच्या पक्षाने मैदान सोडून दिले व अविश्वास ठराव एकतर्फी मंजूर झाला. पण हे होईपर्यंत जे असंख्य नाट्यपूर्ण प्रकार घडले त्यावरून पाकिस्तानचे राजकारण हे इथून बराच काळ अस्थिरच राहणार असल्याचे संकेत मिळाले. इम्रान यांनी शेवटच्या चेंडूपर्यंत खेळण्याच्या बाता मारल्या होत्या. पण प्रत्यक्षात पाकिस्तानी संसद सभागृहात ते फिरकलेच नाहीत. त्याऐवजी विविध अफवा पसरवण्याला ते मदत करीत राहिले. खेळपट्टीवर समोरासमोर लढत देण्याऐवजी पॅव्हेलियनमध्ये बसून काड्या करण्यासारखा हा प्रकार होता. देशात मार्शल लॉ म्हणजे लष्करी कायदा लागू केला जाणार असल्याची चर्चा आहे अशी फुसकुली तर खुद्द पाकिस्तानी माहिती व प्रसारणमंत्री फवाद चौधरी यांनीच पत्रकारांशी बोलताना सोडून दिली. पाकिस्तानी संसदेचे कामकाज प्रदीर्घ काळ चालवत ठेवण्याची खेळीही इम्रानने खेळून पाहिली. त्याच्या पक्षाचे खासदार लांबच लांब भाषणे करीत राहिले. त्याच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अविश्वास ठराव हे अमेरिकेचे कारस्थान असल्याचा आरोप पुन्हा एकवार केला. संसदेचे कामकाज चार वेळा तहकूब करावे लागले. त्यातच लष्करप्रमुख कमर जावेद बाजवा यांनी इम्रान खानची भेट घेतल्याने तर्क सुरू झाले. बाजवा यांना लष्करप्रमुखपदावरून हटवण्यात येणार असल्याच्या बातम्याही जोरात चालल्या. इतर कोणत्या नसला तरी बातमी देणाऱ्या कर्कश टीव्ही वाहिन्यांच्या बाबतीत पाकिस्तान हा भारताशी नक्की बरोबरी करू शकेल. यातल्या काहींनी लष्करप्रमुख जणू गेलेच अशा बातम्या दिल्या. इम्रान यांनी असे काही केलेच तर त्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका दाखल करण्याची तयारी झाली. अशा उलटसुलट याचिकांची तातडीने सुनावणी करण्यासाठी इस्लामाबादेत उच्च व सर्वोच्च न्यायालये रात्रभर खुली ठेवण्यात आली. न्यायालयांचा एकूण पवित्रा व लष्करशाहीने घेतलेली सावध भूमिका यामुळेच बहुधा इम्रान यांनी पराभव मान्य केला. आता ते पुन्हा सत्तेत येण्याची भाषा करीत आहेत. पण ते दोन कारणांनी शक्य नाही. एक तर जनतेत त्यांना पूर्वी होता तेवढाही पाठिंबा शिल्लक राहिलेला नाही. दुसरे म्हणजे पहिल्या वेळी लष्कराने उचलून धरले म्हणून तर इम्रान आजवर पंतप्रधान राहिले. आपल्या वागण्यामुळे इम्रान यांनी तो दरवाजा आता बंद केला आहे. त्यांच्या काळात अर्थव्यवस्थेचे तीन तेरा वाजले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानचे सहाशे कोटी डॉलर्सचे कर्ज रोखून ठेवले. सौदी अरेबियासारख्या देशांसाठी पाकिस्तान लष्करी जवान पुरवत असतो. तरीही त्यांनी पाकिस्तानला मदत करण्याचे नाकारले. चीन व पश्चिम आशियाला जोडणाऱ्या रस्त्याच्या प्रकल्पामुळे आपल्याकडे चिनी भांडवल मोठ्या प्रमाणात येईल असे त्यांना वाटत होते. पण चीन हा किती बेरकी व घातक सावकार आहे हे श्रीलंकेला आज कळते आहे. उद्या पाकिस्तानला कळणार आहे. पाकिस्तानात मध्यंतरी प्रचंड भाववाढ झाली. तेव्हा मी 'आलू-टमाटर'चे भाव माहिती करून घ्यायला पंतप्रधान झालेलो नाही असे उद्दाम उद्गार इम्रान यांनी काढले होते. असे बोलणारे नेते आपल्याकडेही आहेत. त्यांनी इम्रानचे काय झाले हे लक्षात ठेवले तर बरे. पाकिस्तानचे असे हाल होण्यामुळे आपल्याकडच्या काही लोकांना आनंदाच्या उकळ्या फुटत असतात. पण असा अशांत आणि आर्थिकदृष्ट्या अस्थिर शेजारी असणं हे आपल्याही हिताचं नाही हे लक्षात ठेवायला हवे.

अनिल आठल्ये (निवृत्त कर्नल)

# कंगोरे जागतिक सत्तासंतुलनाचे

***एकविसाव्या शतकात भारत आर्थिकदृष्ट्या पाचव्या क्रमांकावर तर लष्करीदृष्ट्या तिसऱ्या क्रमांकावर आहे. ज्या गटात जाईल त्या गटाचं पारडं जड करण्याची क्षमता आज भारतात आहे. म्हणूनच भारताच्या भूमिकेकडे सर्व देशांचं लक्ष लागलं आहे. शीतयुद्ध काळाप्रमाणे अलिप्तवादाची भूमिका घेणं आज भारताला परवडणारं नाही. अमेरिका आणि रशियापैकी कोणत्या गटात गेल्यानं आपलं राष्ट्रीय हित साध्य होईल हे बघणं सध्या गरजेचं आहे.***



भारत आणि रशिया किंवा पूर्वाश्रमीचा सोव्हिएत संघ यांच्यामध्ये गेल्या ७५ वर्षांपासून अत्यंत निकटचे संबंध राहिले आहेत. संपूर्ण शीतयुद्धाच्या काळात अमेरिका, पाकिस्तान आणि १९७० च्या दशकानंतर चीन यांची संयुक्त फळी भारतविरोधात तयार झाली होती. काश्मीर प्रश्नावर वेळोवेळी रशियानं आपला नकाराधिकार वापरुन राष्ट्रसंघात भारताची पाठराखण केली होती. १९७१ च्या युद्धात अमेरिका आणि चीन हे दोघेही पाकिस्तानच्या बाजूने असताना केवळ रशियाच्या लष्करी पाठिंब्यामुळेच आपण बांगलादेश युद्धात पूर्ण विजय मिळवू शकलो. अशा प्रकारे भारत-रशिया संबंधांना एक महत्त्वाची सामरिक पार्श्वभूमी आहे. पडद्यामागे आणि गुप्तपणे रशियाने भारताला अंतरिक्ष संबंधांमध्ये, क्षेपणास्त्राच्या क्षेत्रात आणि आण्विक पाणबुडी निर्माण करण्याच्या क्षेत्रात भरीव मदत केली आहे. आजही भारताची ६० ते ७० टक्के लष्करी सामग्री रशियन बनावटीची आहे.

१९९२ मध्ये सोव्हिएत संघाच्या विघटनानंतर उर्वरित रशिया हा सामरिक दृष्टीनं कमकुवत झाला आणि त्याला आर्थिक पेचप्रसंगांना तोंड द्यावं लागलं. या काळात भारतानं रशियाला आर्थिक मदत पुरवल्याचा दाखला आहे. शीतयुद्धानंतरच्या बदललेल्या परिस्थितीत अमेरिका आणि चीनदरम्यान सामरिक स्पर्धा सुरू झाली. या बदलत्या परिस्थितीत भारतानं अलिप्त राहण्याची भूमिका घेऊन चीन आणि अमेरिका या दोघांशीही चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात विशेष यश आलं नाही आणि दोन वर्षांपूर्वी चीनने लडाख क्षेत्रात आगळीक करुन त्या प्रयत्नांना सुरुंग लावला. साहजिकच या स्थितीचा फायदा घेत अमेरिकेने भारताशी जवळीक साधली. आज भारताकडे विशेषत: हवाई दलात अमेरिकेची अनेक विमानं दाखल झाली आहेत. परंतु रशिया आणि भारत यांचे संबंध केवळ शस्त्रास्त्रांच्या आयातीपुरते मर्यादित नाहीत. भविष्यकाळात रशिया आणि चीन एकमेकांच्या फार जवळ आले तर भारतापुढे फार मोठं आव्हान उभं राहू शकतं. रशियाचं लष्करी तंत्रज्ञान आणि चीनची औद्योगिक आणि आर्थिक शक्ती एकत्र आल्यास ते देश अमेरिकेच्या जागतिक एकाधिकारशाहीला आव्हान देऊ शकतात.

चीन आणि रशिया यांच्यामध्ये आज कितीही जवळीक असली तरी भविष्यकाळात रशियाच्या पूर्वेकडील भागावर चीन आपला हक्क सांगण्याची शक्यता नाकारता येत नाही. दोन्ही देशांना भविष्यकाळातल्या या संघर्षाची पूर्ण जाणीव आहे. या जागतिक सत्तासंतुलनाच्या बदलाला सामोरं जाण्यासाठी भारताने प्रयत्नपूर्वक रशिया आणि पाश्चिमात्य देशांच्या संघर्षात मध्यस्थाची भूमिका घेतली आहे. यामुळेच राष्ट्रसंघात रशियाचा संपूर्ण विरोध करण्यापासून भारत आपला बचाव करत आला आहे. परंतु राष्ट्रपती पुतीन यांच्या युक्रेनवरील हल्ल्यानंतर पाश्चिमात्य देशांचं जनमत इतकं रशियाविरुद्ध गेलं आहे की भारताला अलिप्तपणाची भूमिका घेणं दिवसेंदिवस कठिण होत आहे.

बरोबर पन्नास वर्षांपूर्वी म्हणजे १९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती रिचर्ड निक्सन आणि चीनचे सर्वेसर्वा माओ यांच्यात शांघाय करार झाला होता. या कुटनितीमागे कम्युनिस्ट गटात रशिया (सोव्हिएत संघ) आणि चीन यांच्यात दुफळी निर्माण करायची खेळी होती. ही चाल यशस्वी झाली आणि सोव्हिएत संघ जगात एकटा पडला. अखेरीस १९९२ मध्ये त्याचा विलय झाला. आज बरोबर पन्नास वर्षांनंतर अमेरिकेच्या धोरणांमुळे रशिया आणि चीन एकत्र येत आहेत. भविष्यकाळात संपूर्ण जगावर अधिपत्य गाजवण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण होवू शकते. रशियाला चीनच्या मगरमिठीत ढकलण्यास अमेरिकेचं विस्तारवादी धोरण कारणीभूत आहे. अथक प्रयत्न करुनही अमेरिकेचं रशियासंदर्भातलं धोरण बदलण्यात आपण अयशस्वी ठरलो. आज रशिया कच्चं तेल आणि खनिज संपत्ती निर्यात करुन जगत आहे. कम्युनिस्ट राजवटीत बदल झाल्यानंतरदेखील रशियामध्ये आर्थिकदृष्ट्या सुबत्ता येऊ शकलेली नाही. म्हणूनच रशियाच्या आसपासचे युक्रेन, जॉर्जियासारखे देश युरोपकडे आकृष्ट होत आहेत. सैन्यदलाच्या बळावर रशिया या देशांना आपल्या कह्यात ठेवू शकणार नाही, ही मात्र वस्तुस्थिती आहे.

आज रशियाची लोकसंख्या जेमतेम २० कोटींच्या आसपास आहे आणि त्यात झपाट्याने घट होत आहे. जपानप्रमाणेच रशियाला कमी होणाऱ्या लोकसंख्येचा प्रश्न भेडसावत आहे. अशा परिस्थितीत गेल्या दोन ते तीन दशकांपासून रशिया, चीन आणि भारत असा एक गट निर्माण केला गेला. त्यात भारताच्या दृष्टीनं बघायचं झालं तर भारत-चीन आर्थिक संबंध अत्यंत जवळचे आहेत. भारतीयांना ऐकून आश्चर्य वाटेल की बहुतांश शहरांमध्ये सुरू असलेले मेट्रो रेल्वेचे प्रकल्प चीनी यंत्रसामग्रीद्वारा अमलात येत आहेत. आजसुद्धा व्यापारी संबंधांमध्ये चीन हा भारताचा पहिल्या क्रमांकाचा सहकारी आहे. रशियाशी असलेल्या आपल्या लष्करी संबंधांबद्दल अवघ्या जगाला माहीत आहे. परंतु या तीन देशांचा हा गट सक्षम बनण्यात सगळ्यात मोठा अडथळा चीन-पाकिस्तान संबंधांचा आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून चीन भारताविरुद्ध पाकिस्तानचा एक प्यादं म्हणून उपयोग करत आहे. काश्मीर प्रश्नावरदेखील चीनने नेहमीच पाकिस्तानची पाठराखण केली आहे. थोडक्यात, भारताशी मैत्री वाढवायचे तर चीनला पाकिस्तानबरोबरच्या संबंधांमध्ये बदल करावे लागतील. मात्र हे न होण्याचं मुख्य कारण म्हणजे चीनच्या हिशेबात भारत महाशक्ती बनण्याच्या पात्रतेचा देश आहे की नाही याबद्दल साशंकता आहे. या चीनी धारणेचं मुख्य कारण म्हणजे भारतात अंतर्गत कलहाची परिस्थिती कायम राहणार, असा चीनचा होरा आहे. अशा अंतर्गत अशांततेच्या परिस्थितीत भारत लष्करी वा आर्थिकदृष्ट्या जगात मोठी सत्ता बनेल असं चीनला वाटत नाही. भारताच्या भविष्यकाळाबद्दल चीनचं मत बदललं आणि भारतात अंतर्गत ऐक्य निर्माण झालं तर चीन पाकिस्तानला दिली जाणारी मदत थांबवू शकतो. पाकिस्तानवर दबाव आणून त्या देशाला भारताशी मैत्रीचे संबंध ठेवण्यास चीन बाध्य करु शकतो. अशा प्रकारे भारत-चीन संबंध आणि भारत, रशिया आणि चीन या देशांचं एकत्र येणं हे भारतातल्या अंतर्गत परिस्थितीवर अवलंबून आहे. भौगोलिकदृष्ट्या चीनला समुद्राशी संपर्क साधण्यासाठी पाकिस्तानपेक्षा भारत हा देश जास्त संयुक्तिक आहे. सिक्कीममधून कोलकत्याला समुद्रमार्गे संपर्क ठेवणं जास्त संयुक्तिक आहे. परंतु हे न होण्याचं मुख्य कारण म्हणजे भारत-चीन या देशांमध्ये असलेला परस्परविश्वासाचा अभाव.

अशा प्रकारे जागतिक स्तरावर दोन गटांपैकी एक गट निवडण्याचा दबाब भारतावर दोन्ही बाजूंनी येऊ शकतो. स्वातंत्र्यानंतर लगेचच शीतयुद्ध काळातदेखील अशाच प्रकारची परिस्थिती उद्भवली होती. त्यावेळी भारताने अलिप्तवादाची भूमिका घेऊन दोन्ही डगरींवर पाय ठेवण्याचे प्रयोग यशस्वी केले होते. परंतु शीतयुद्धकाळात आणि आजच्या परिस्थितीत एक महत्वाचा फरक आहे. या दोन गटांमधला एक गट म्हणजे चीन आणि काही अर्थानं रशिया हे भारताचे भौगोलिक शेजारी आहेत. खेरीज शीतयुद्ध काळात भारत आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या अत्यंत कमकुवत होता. त्यामुळे जागतिक शक्तीसंतुलनात त्याचं महत्त्व नगण्य होतं. थोडक्यात, भारत कोणत्या गटात जातो याला अमेरिका किंवा सोव्हिएत संघ हे तितकंसं महत्त्व देत नसत. परंतु आज एकविसाव्या शतकात भारत आर्थिकदृष्ट्या पाचव्या क्रमांकावर तर लष्करीदृष्ट्या तिसऱ्या क्रमांकावर आहे. ज्या गटात जाईल त्याचं पारडं जड करण्याची क्षमता आज भारतात आहे. म्हणूनच भारताच्या भूमिकेकडे सर्व देशांचं लक्ष लागलं आहे. गेल्या आठवड्याभरात जगातल्या सर्व महत्त्वाच्या देशांचे प्रतिनिधी दिल्लीला भेट देऊन गेले.

शीतयुद्ध काळाप्रमाणे अलिप्तवादाची भूमिका घेणं आज भारताला परवडणारं नाही. दोन्हीपैकी कोणत्या गटात गेल्यानं आपलं राष्ट्रीय हित साध्य होईल हे आता बघणं गरजेचं आहे. नजिकच्या काळाचा विचार केला तर भारताला पाश्चिमात्य गटात जाणं सोयीचं वाटत आहे. परंतु दूरवरचा विचार केल्यास भविष्यकाळात चीन जागतिक महाशक्ती बनल्यास त्याला टक्कर देण्याची आर्थिक, लष्करी कुवत आणि राजकीय इच्छाशक्ती भारतात आहे का, हादेखील महत्त्वाचा प्रश्न आहे.

# रायगड तापतोय

चैत्राची पालवी फुटत असताना सृष्टीत मात्र वैशाख वणवा पेटू लागल्यासारखे वातावरण निर्माण झालेले आहे. अवघा महाराष्ट्र सूर्यनारायणाच्या कडक उन्हाने भाजून निघालाय. रायगडलाही या उन्हाचे चटके बसताना दिसत आहेत. दक्षिण रायगडातील महाड, पोलादपूर परिसरात दिवसाचे तापमान ४४ अंशावर जाऊन पोहोचले आहे. तर रात्रीचे तापमानही खूपच गरम झालेले आहे. त्यामुळे सर्वांची नुसती लाहीलाही झालेली आहे. सध्या मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. रस्ता रुंदीकरणासाठी महामार्गावरील हजारो झाडांची कत्तल करण्यात आली आहे. सिमेंट काँक्रिटीकरण सुरु असल्याने त्याचा परिणामही वातावरणावर झालेला आहे. झाडांची कत्तल झाल्याने महामार्गावरील गारवाच हरविला आहे. त्यामुळे रस्ते अधिक तापू लागलेले आहे. त्याचा परिणामही तापमानवाढीवर होत आहे. पर्यायाने आता महामार्गाचे काम सुरु असतानाच नवीन वृक्ष लागवड करणे अत्यंत जिकीरीचे बनले आहे. ते जर केले गेले नाही तर याची मोठी झळ निसर्गाबरोबरच मानवाला बसणार आहे. पशु, पक्षीही या उन्हाच्या तडाख्याने हवालदिल झालेले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी हे पशु, पक्षी किती भटकंती करत असतात हे परमेश्वरालाच ठाऊक. यासाठी आपण सर्वांनीच भूतदया दाखवित घरासमोर, अंगणात, फ्लॅटच्या रिकाम्या जागेत पशु, पक्ष्यांसाठी पाण्याची सोय केली पाहिजे. हे सर्वांनीच केले तर आपण काहीतरी देऊ शकतो याची जाणीव होत राहिल.शेवटी मानवाला निसर्गाची नितांत गरज आहे. त्यासाठी निसर्गाचे संवर्धन करणे, वाढविणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे. दरवर्षी उन्हाळा आला की सावली देणाऱ्या वृक्षांची आठवण होते. पण पावसाळ्यात आपण नवीन वृक्ष लागवड करण्यास विसरुन जातो. हे दरवर्षी होत असते. हे टाळायचे असेल तर वृक्षलागवडीचा संकल्प करुन तो येणाऱ्या पावसाळ्यात पूर्ण करण्याचा निर्धार करा. तसे घडले तरच पुढील वर्षाच्या उन्हाला सुसह्य वाटल्याशिवाय राहणार नाही.

यार-वार
अतुल गुळवणी

# कुस्तीत 'पृथ्वीराज'

कुस्तीची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापूर नगरीला तब्बल २२ वर्षानंतर नवा महाराष्ट्र केसरी मल्ल गवसला आहे. पृथ्वीराज पाटील याने सातारा येथे झालेल्या राज्यस्तरीय कुस्तीस्पर्धेत चमकदार कामगिरी करीत महाराष्ट्र केसरीचा बहुमान आणि प्रतिष्ठेची गदा पटकाविली आहे. याबद्दल त्याचे मनापासून अभिनंदन आणि भाविक कारकिर्दीस शुभेच्छा. राजर्षी शाहू महाराज यांनी राज्य चालवितांना आपल्या संस्थानातील मल्लांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अनेक तालमींची निर्मिती करुन होतकरु मल्लांना प्रोत्साहन दिले. त्यासाठी मध्यवर्ती ठिकाणी खासबाग सारखा भव्यदिव्य असा कुस्ती आखाडाही निर्माण केला. त्यात अनेक देशविदेशातील नामवंत मल्लांच्या चमकदार कुस्त्या कोल्हापूरकरांना पाहता आल्या. त्याच्या आठवणी सांगणारे शेकडोजण आजही कोल्हापूरात आहे. संस्थान खालसा झाले त्याचबरोबरच कुस्तीला मिळालेला राजाश्रयही तुटला. आजमितीस कोल्हापुरातील कुस्तीचे आखाडे ओस पडलेले आहेत. त्यातून ज्या काही तालमी अस्तित्वात आहेत त्यामधून पृथ्वीराज सारखे मल्ल सराव करुन कुस्तीची पताका फडकावितांना दिसत आहे. पृथ्वीराज पाटील हा पन्हाळा तालुक्यातील होतकरु मल्ल. आर्मीच्या सेवेत असतानाही त्याने कुस्तीचा सराव सोडला नाही आणि त्याचे फळ पृथ्वीराजला मिळाले.हे निश्चितच कौतुकास्पद आहे.कारण आज देशाला, राज्याला पृथ्वीराज सारख्या युवा मल्लांची नितांत गरज आहे. १२० कोटी लोकसंख्या असलेल्या भारताला ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीयस्तरावर हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच पदके जिंकता येतात हे दुर्दैव म्हटले पाहिजे. पदकांचा हा वनवास संपला पाहिजे. यासाठी पृथ्वीराज पाटील यांच्यासारख्या युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्याबरोबरच राजाश्रय मिळणे गरजेचे आहे. या खेळाडूंना जर सरकारने सर्वतोपरी सहकार्य केले तर हे देशाचे, राज्याचे नावं निश्चितच उज्वल करतील. यासाठी सामाजिक संघटनांनीही पुढाकार घेणे आवश्यक आहे.

म्हणून नेत्याची शिकवण ही अशा आदर्श शास्त्रांच्या सिद्धांतावर आधारीत असली पाहिजे. जी स्वतः उन्नत होऊ इच्छितो त्याने महान आचार्यांनी अनुसरण केलेल्या आदर्श सिद्धांतांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. श्रीमद्भागवतही निश्चितपणे सांगते की, मनुष्याने महान भगवद्भक्तांच्या पावलांचे अनुसरण करणे आवश्यक आहे आणि आध्यात्मिक साक्षात्काराच्या पथावरील प्रगतीचा हाच योग्य मार्ग आहे. राजा किंवा राज्याचा कार्यकारी प्रमुख, प्रशासक, पिता आणि शालेय शिक्षक या सर्वांना सामान्य साध्याभोळ्या निष्पाप लोकांचे स्वाभाविक नेते मानण्यात येते. या सर्व स्वाभाविक नेत्यांवर, त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची मोठी जबाबदारी असते. यास्तव त्यांनी नैतिक आणि आध्यात्मिक संहिता असणाऱ्या सर्व आदर्श ग्रंथांमध्ये पारंगत असणे अत्यावश्यक आहे.

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किश्चन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।।२२।।**

**न-** नाही; **मे-** माझे; **पार्थ-** हे पृथापुत्रा; **अस्ति-** आहे; **कर्तव्यम्-** कर्तव्य किंवा विहित कर्म; **त्रिषु-** तिन्ही; **लोकेषु-** लोकांमध्ये; **किश्चन-** काहीसुद्धा; **न-** काहीच नाही; **अनवाप्तम्-** गरज आहे; **अवाप्तव्यम्-** प्राप्त करण्यालायक; **वर्ते-** मी करीत आहे; **एव-** निश्चितच; **च-** सुद्धा; **कर्मणि-** नियत कर्मामध्ये

**हे पार्थ! या तिन्ही लोकांमध्ये माझ्यासाठी कोणतेही नियत कर्म नाही, मला कशाची उणीव नाही तसेच मला काही प्राप्त करावयाची आवश्यकता नाही आणि तरीसुद्धा मी नियत कर्माचे आचरण करतो.**

**तात्पर्य :** वेदांमध्ये पुरुषोत्तम श्रीभगवान यांचे वर्णन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**तमीश्वराणां परमं महेश्वरं तं देवतानां परमं च दैवतम् ।**
**पतिं पतीनां परमं परस्ताद् विदाम देवं भुवेनशमीड्यम ।।**
**न तस्य कार्यं करणं च विद्यते न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते ।**
**परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रियाच ।।**

'परमेश्वर हे इतर सर्व नियंत्रकांचे नियंत्रक आहेत आणि ते विविध ग्रहांच्या सर्व देवतांपेक्षाही श्रेष्ठ आहेत. प्रत्येकजण त्यांच्या नियंत्रणाखाली आहे. केवळ भगवंतांनीच सर्व जीवांना विशिष्ट शक्ती प्रदान केल्या आहेत, जीव स्वतःहून श्रेष्ठ नाहीत. ते सर्व देवदेवतांद्वारे पूजनीय आहेत आणि ते सर्व नियंत्यांचे सर्वश्रेष्ठ नियंता आहे. म्हणून ते सर्व प्रकारच्या भौतिक नेत्यांपेक्षा आणि नियंत्रकांपेक्षा दिव्य आहेत आणि सर्वांद्वारा पूजनीय आहेत. त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असा कोणीही नाही आणि तेच सर्व कारणांचे परम कारण आहेत.

भगवंतांच्या शरीराचे स्वरुप सामान्य जीवासारखे नाही. त्यांच्या शरीरामध्ये आणि आत्म्यामध्ये काहीच फरक नाही. ते परिपूर्ण आहेत. त्यांची सर्व इंद्रिये दिव्य आहेत. त्यांच्या इंद्रियांपैकी कोणतेही एक इंद्रिय इतर कोणत्याही इंद्रियांचे कार्य करु शकते. म्हणून त्यांच्याबरोबरीचा किंवा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असा कोणीही नाही. त्यांच्या शक्ती विविध प्रकारच्या आहेत आणि याप्रमाणे त्यांचे कार्य आपोआपच स्वाभाविक क्रमाप्रमाणे घडत जाते.'

भगवंतांमध्ये प्रत्येक गोष्ट परिपूर्म ऐश्वर्याने ओतप्रोत आणि पूर्ण सत्यत्वाने वास करीत असल्यामुळे पुरुषोत्तम श्रीभगवान यांना करण्यास कोणतेही कर्तव्य असत नाही. जो मनुष्य कर्मफल घेण्यास बाध्य आहे त्याच्यासाठी विशिष्ट कर्तव्य असतेच,पण ज्याला तिन्ही लोकांमधूनही काहीच प्राप्त करावयाचे नसते त्याला निश्चितच कोणतेही कर्तव्य नसते. तरीसुद्धा क्षत्रियांचे नेता म्हणून भगवान श्रीकृष्ण कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीमध्ये कार्यरत आहेत. कारण पीडित लोकांचे रक्षण करण्यास क्षत्रिय कर्तव्यबद्ध असतात. भगवंत जरी शास्त्रांच्या सर्व नियमांच्या पूर्णपणे अतीत असले तरी ते शास्त्रनियमांचे उल्लंघन होईल अशी कोणतीही गोष्ट करीत नाहीत.

**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।।२३।।**

**(क्रमशः)**

## लोकसंसद

### वाघांचे वाढते मृत्यू चिंताजनक

देशात वाघांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी एकूण ५० व्याघ्र प्रकल्प कार्यान्वित आहेत. या व्याघ्र प्रकल्पांमुळे देशात वाघांची संख्या काही प्रमाणात वाढली आहे. २००६ च्या व्याघ्रगणनेत १ हजार ४११ वाघ होते ती संख्या १२ वर्षांत दुपटीपेक्षा अधिक वाढली. २०१८ मध्ये करण्यात आलेल्या व्याघ्रगणना सर्वे क्षणानुसार देशात २ हजार ९६७ वाघांची नोंद करण्यात आली. विशेष म्हणजे जगातील एकूण व्याघ्रसंख्येच्या ७५ टक्के वाघ भारतात आहेत. मात्र व्याघ्र संरक्षण आणि संवर्धनाच्या या आशादायी आणि आनंददायी वातावरणावर विरजण पडावे अशा वाघांच्या मृत्यूंच्या चिंताजनक बातम्या समोर येत आहेत. राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार देशात यावर्षीच्या पहिल्या तिमाहीतच ३९ वाघांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये वाघांचे आठ बछडे, वीस वाघ आणि नऊ वाघिणींचा समावेश आहे. दोन मृत्यूंमध्ये वाघ की वाघीण हे कळलेले नाही. २०१९ मध्ये देशात ९५ वाघ मृत्युमुखी पडले होते, तर २०२० मध्ये ही संख्या १०६ वर गेली आणि गेल्या वर्षी १२७ वाघांनी मृत्यूला कवटाळले. वाघांचे संरक्षण, संवर्धन आणि देखभालीसाठी ५० व्याघ्र प्रकल्प कार्यान्वित असतानाही वाघांच्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या मृत्यूंमुळे व्याघ्र प्रेमींकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, वाघांच्या मृत्यूंच्या वाढत्या संख्येमुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी व्याघ्र संरक्षण आणि संवर्धनावर अधिक गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### काळ्या-पिवळ्या टॅक्सींची हाक

पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅस पाठोपाठ स्वस्त वाहन इंधन म्हणून ओळखले जाणाऱ्या सीएनजीच्या दरात ७ रुपयांनी वाढ झाली. त्यामुळे शहरातील टॅक्सी चालक संघटना सरकारकडे भाववाढ करण्याच्या पावित्र्यात आहे. परंतु, त्यातही दोन मतप्रवाह असून काही भाववाढ किमान २५ वरून ३० करण्यासाठी आग्रही आहेत. तर काहींना शहरात मेट्रो व वातानुकूलित बस सेवा असल्याने प्रवासी दुरावतील या चिंतेत आहेत. राज्य सरकारने मूल्यावर्धित कर कमी केला असला तरी प्रत्यक्षात त्याचा सीएनजी वाढीवर कोणताही परिणाम झाला नसून, प्रत्यक्षात सीएनजी ७ ने महाग

झाला आहे. म्हणजेच ही भाडेवाढ ३५% आहे. इंधनाच्या दरात २५% पेक्षा जास्त झाल्यास तात्काळ भाडेवाढ करण्यात येते.परंतु, ग्राहकांना शहरात अधिक पर्याय उपलब्ध असल्याने टॅक्सी चालक व संघटना विचित्र कात्रीत सापडले आहेत.कोरोना संक्रमण काळात टॅक्सी चालकांना खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागल्याने टॅक्सी चालकांनी सरकारकडे किमान भाडे ३० करण्यात यावे, असा प्रस्ताव ठेवला आहे. खासगी वाहतूक कंपन्यांच्या वाहतुकीने आधीच प्रभावित झालेल्या काळ्या पिवळ्या टॅक्सी चालकांचा हॉर्न (हाक) सरकारपर्यंत पोहोचायला हवी.

**- दत्तप्रसाद शिरोडकर,** मुलुंड

### करियर मार्गदर्शन जरूरीचे...

आता दहावी बारावीच्या परीक्षा संपत आल्या आहेत. थोडयाच दिवसात या परीक्षांचे निकाल लागतील.त्यानंतर पुढे कुठल्या शाखेत जायचे... याचे वेध सुरु होतील. आज अनेक ठिकाणी जवळपासचे विद्यार्थी ज्या शाखेची निवड करतात त्याच शाखेला बहुसंख्यांक विद्यार्थी जातात. त्यांची आवड व कल याचा विचार केला जात नाही. कित्येक मुलांना चित्रकला आवडते त्यांना आर्किटेक्टला जाण्याची इच्छा पण असते पण योग्य मार्गदर्शनाअभावी ते जाऊ शकत नाहीत. अभियांत्रिकी, वैद्यकीय या शाखाशिवाय पर्यटन, औषध शास्त्र, चित्रपट माध्यमे, स्पर्धा परीक्षा, हॉटेल मॅनेजमेंट, पत्रकारिता, संगणक शास्त्र, पर्यावरण शाखा अशा अनेक शाखा उपलब्ध आहेत. कोणत्या शाखेत विद्यार्थी ओढा आहे...! कोठे गेले तर नोकरी चटकन मिळू शकेल, कोणत्या शाखेला परदेशी मोठी मागणी आहे! इत्यादी गोष्टी केवळ योग्य मार्गदर्शनानेच कळू शकतात. आजकाल अनेक वर्तमानपत्रे याबाबत मार्गदर्शन करतात पण खेड्यात अजूनही याबाबत योग्य ते मार्गदर्शन होत नाही. मोठ्या शहरात याबाबतचे सेमिनार आयोजित केले जातात. पण ते सर्वांनाच उपलब्ध होतात असेही नाही. यासाठी प्रत्येक शाळेत मुलांना मार्गदर्शनाची व्यवस्था हवी. याशिवाय ज्या ठिकाणी नगरपालिका किंवा महानगर पालिका असतील तेथे अशा प्रकारच्या मुलांना मोफत मार्गदर्शन मिळेल अशी सुविधा उपलब्ध करावी. ज्यामुळे विद्यार्थ्यांना सर्व बाजूंचा विचार करता येईल व आपल्या आवडीप्रमाणे पुढील निर्णय घेता येईल.

**- शांताराम वाघ,** पुणे

### ३३० किमीचा प्रवास

# वेळासचे प्रथमा कासव गुजरातच्या किनाऱ्यावर सुखरूप

## गुजरात किनाऱ्याजवळ पोहचले

*। रत्नागिरी । प्रतिनिधी ।*

*समुद्री कासवांच्या अभ्यासासाठी सॅटेलाइट टॅगिंग केलेल्या कासवांपैकी प्रथमाने गुजरातचा किनारा गाठला आहे. या कासवाने सर्वाधिक ३३० किलोमीटरचा प्रवास केला आहे; तर सावनी आणि वनश्री यांनी रेवा कासवाच्या दिशेने आणखी दक्षिणेकडे म्हणजेच कर्नाटकच्या दिशेने जाण्यास सुरुवात केली आहे. रेवा सातत्याने दक्षिणेकडे सरकत असून, ते कारवारपासून ४०, तर मंगळूरपासून ८० किलोमीटर अंतरावर आहे.*

*वेळास, आंजर्ले, गुहागर या किनाऱ्यांवर अंडी घालून समुद्रात जाणाऱ्या कासवांना टॅगिंग केले असून, त्यांना नावेही देण्यात दिली आहेत. यातील 'प्रथमा' नामक कासवाचा प्रवास पुढेच सुरू असून, ते गुजरातच्या किनाऱ्यावर पोचले आहेत. आतापर्यंत वेळासपासून प्रथमाने ३३० किलोमीटरचे अंतर पार केले आहे. ते सध्या दीव किनाऱ्यापासून ६५ किमी अंतरावर आहे. सावनी हे सध्या महाराष्ट्राच्या किनारपट्टीपासून सुमारे ९० किमी सरळ रेषेत प्रवास करत आहे. रेवा सातत्याने दक्षिणेकडे सरकत असून आणि गोवा ओलांडून ती कर्नाटकच्या पाण्यात शिरली आहे. सध्या कर्नाटकातील कारवारपासून ४० किमी अंतरावर आहे. वनश्री किनाऱ्यानेच दक्षिणेकडे जात असून, ती सध्या आंबोळगड किनाऱ्यापासून सुमारे २५ किमी सरळ रेषेत आहे.*

> टॅगिंग केलेल्या कासवांचा प्रवास सुरू आहे. त्यांच्याविषयीची निरीक्षणे केली जात आहेत. वर्षभरानंतर त्यांच्या एकूण प्रवासातील घटनांवरून निरीक्षणे नोंदवता येतील.
> – हर्षल कर्वे, सागरी जीवशास्त्रज्ञ,

### कांदळवन प्रतिष्ठानचा उपक्रम

कोकण किनारपट्टीवर अंडी घालण्यासाठी येणाऱ्या ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवांचे संवर्धन करून अभ्यास करण्यासाठी वनविभागाच्या कांदळवन प्रतिष्ठान कडून पावले उचलण्यात आली आहेत. गेल्या तीन महिन्यांत पाच कासवे सोडण्यात आली. त्यातील लक्ष्मी हे कासव महिन्याभरातच संपर्काबाहेर गेले; तर उर्वरित चार कासवांची सद्य:स्थितीवर कांदळवन विभागाचे सागरी जीवशास्त्रज्ञ हर्षल कर्वे लक्ष ठेवून आहेत.

**महत्त्वाचे**

### सुमित्रा महाजन यांचे चिपळूणमध्ये स्वागत

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

माजी लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन या चिपळूण येथे विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमास उपस्थित असता भाजपा माजी तालुकाध्यक्ष विनोद भोबस्कर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी माजी नगराध्यक्षा सुरेखा खेराडे, तालुकाध्यक्ष वसंत ताम्हणकर, शहराध्यक्ष आशिष खातू, परिमल भोसले, माजी नगरसेविका रसिका देवळेकर, रत्नदिप देवळेकर, प्रथमेश भोबस्कर, मंदार कदम, उल्हास भोसले, समीर राऊत, तुषार गोखले उपस्थित होते.

### कृषी सहायक तरुणीची आत्महत्या

**। देवरुख । वार्ताहर ।**

देवरुखमध्ये ता. संगमेश्वर कृषी सहायक तरुणीने आत्महत्या केली. पूजा शिवकुमार रजपूत (वय २८, मूळ गाव उस्मानाबाद) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. शनिवारी (ता. ९) सकाळी साडेदहाच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. आत्महत्येचे कारण अद्याप उघड झाले नाही.याबाबत देवरुख पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, पूजा राजपूत ही तरुणी संगमेश्वर तालुका कृषी कार्यालयात कृषी सहायक पदावर गेली चार वर्षे कार्यरत होती.

# नरडवे धरणला विरोध वाढला

## मरण पत्करू; पण काम बंदच ठेवण्याचा इशारा

**। कणकवली । प्रतिनिधी।**

मेलो तरी चालेल, मुलाबाळांना घेऊन आम्ही नरडवे धरण प्रकल्पाला विरोध करणारच. पोलिसांच्या लाठ्या काठ्या खाण्याची तयारी आहे. गोळीबार झाला तरी मरण पत्करू; पण जोपर्यंत प्रश्न सुटत नाहीत, तोपर्यंत धरणाचे काम होऊ देणार नाही, असा इशारा नरडवे धरणग्रस्त कृती समितीच्यावतीने आज येथे देण्यात आला आहे.

येथील पंचायत समितीच्या पत्रकार कक्षामध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये प्रकल्पग्रस्त कृती समितीचे सदस्य बोलत होते. यावेळी धरणग्रस्त समितीचे अध्यक्ष गणेश ढवळ, कृती समितीचे उपाध्यक्ष नित्यानंद सावंत, शासकीय धरणग्रस्त समितीचे माजी सदस्य संतोष सावंत, समितीचे सचिव

प्रभाकर ढवळ, माजी अध्यक्ष व्हिक्टर डिसोजा, प्रकाश सावंत, चंद्रकांत नार्वेकर, सल्लागार जयराम ढवळे आदी उपस्थित होते. यावेळी माहिती देताना सांगण्यात आले की, प्रकल्पाचे काम गेले तीन महिने बंद होते; मात्र ४ एप्रिलला ठेकेदाराने हे काम सुरू केले. हे काम बंद करावे अशी सूचना आम्ही ठेकेदाराला केली.

त्यामुळे ठेकेदाराने काम बंद केले; मात्र प्रकल्प अधिकारी महादेव कदम यांनी सांगितले की, कार्यकारी संचालक यांच्या आदेशाने आम्ही काम सुरू करत आहोत. त्यामुळे आम्ही सांगितले की, तुम्हाला जर काम सुरू करायचे असेल तर नरडवे गावांमध्ये येऊन बैठक घ्या, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य करा, त्यानंतर आम्ही प्रकल्पाचे काम सुरु करण्यास परवानगी देऊ असे सुचवले; मात्र प्रकल्प अधिकारी नरडवेमध्ये येण्यास नकार देत आहेत. अध्यक्ष गणेश ढवळ यांना कणकवली पोलीस ठाण्यातून फोन करण्यात आला.

कार्यकारी अभियंता यांच्या म्हणण्यानुसार तुमच्या मागण्या पूर्ण झालेल्या असताना तुम्ही काम बंद का करता? आम्ही त्यांना स्पष्टपणे सांगितले. जोपर्यंत धरणग्रस्तांचे प्रश्न सुटत नाहीत, तोपर्यंत आम्ही काम होऊ देणार नाही. या प्रकल्पातून जाणारा मोहम्मदवाडी, घोलणवाडी, दुर्गानगर येथे जाणारा मुख्य रस्ता बंद करण्याचा घाट सध्या सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे आम्हाला ११ किलोमीटरचा वळसा घालावा लागणार आहे. आमची मुले शाळेत कशी जाणार? म्हणून हा त्यांचा प्रयत्न आम्ही हाणून पडलेला आहे.

### ४८ गावांना लाभ

**या प्रकल्पातून ८०८४ हेक्टर सिंचन निर्मिती होणार आहे. तीन तालुक्यातील ४८ गावांमध्ये लाभक्षेत्र आहे. या लाभक्षेत्रातील ४७८ हेक्टर जमीन आरक्षित ठेवली आहे; मात्र हे आरक्षण अद्याप उठवलेले नाही. प्रकल्पग्रस्तांना जमिनी देण्यात आलेल्या नाहीत. आम्हाला उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून दिले जात नसेल तर आम्ही धरणाचे काम कसे करू देणार असा सवालही कृती समितीच्यावतीने व्यक्त करण्यात आला आहे.**

# सत्तेसाठी वखवखलेले कटात सामील ; बबन साळगावकर

**। सावंतवाडी । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या मुंबई येथील सिल्व्हर ओक निवासस्थानी झालेला हल्ला हा निंदनीय असून आपण त्याचा तीव्र निषेध करतो. महाराष्ट्राच्या राजकारणाची पातळी किती हीन दर्जाची होत चालली आहे, याचे उदाहरण आपल्याला या कृत्यातून पाहायला मिळाले आहे, अशी प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष बबन साळगावकर यांनी दिली.

सत्तेसाठी वखवखलेले पुढारी या कटामध्ये सहभागी आहेत. याची उच्चस्तरीय चौकशी महाराष्ट्राच्या गृहमंत्रालयाने करावी, अशी मागणी साळगावकर यांनी केली. याबाबत त्यांनी प्रसिद्धीपत्रक दिले असून त्यात म्हटले आहे की, शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी हल्ला करणारे खरे एसटी कर्मचारी होते की भाडोत्री गुंड? याची चौकशी व्हायला हवी. एसटी कर्मचाऱ्यांना आमचाही पाठिंबा होता. त्यांच्या मागण्या पूर्ण व्हाव्यात, यासाठी शासनाकडे पाठपुरावा करत होतो; परंतु पुढे काही दिवसांत एसटी कर्मचाऱ्यांचा राजकारणासाठी वापर सुरू झाला. विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या संपाचा स्वार्थासाठी, राजकारणासाठी वापर करून घेतला, असा आरोपही त्यांनी केला.

# हर्णे बंदरामध्ये हार्डवेअर दुकानाला आग

**। हर्णे । प्रतिनिधी ।**

येथे बंदरामध्ये एका हार्डवेअरच्या दुकानाला आग लागून करोडो रूपयांचे नुकसान झाले आहे. यावेळी या घटनेमध्ये वित्तहानी प्रचंड प्रमाणात झाली असून जीवितहानी मात्र टळली आहे. रात्री हर्णे बंदरामध्ये १२ वाजण्याच्या सुमारास हर्णे, राजवाडी येथील रहिवाशी महेश मळेकर यांच्या बंदरातील हार्डवेअरच्या दुकानाला अचानक आग लागली. ही घटना प्रथम शेजारी असणाऱ्या रामचंद्र पावसे यांना दिसली त्यांनी लगेच आग लागली म्हणून बोंब मारली. लगेचच फत्तेगड, मळ्खांबपेठ, बंदरमोहल्ला, बाजारपेठ येथील सर्व ग्रामस्थ धावून आले.

स्थानिकांनी समुद्र ते आग लागलेले ठिकाणापर्यंत साखळी मध्ये उभे राहून समुद्राच्या पाण्याचा बादलीच्या साहाय्याने मारा करायला सुरुवात केली. तरीही आग आटोक्यात येत नव्हती. त्याचवेळी फत्तेगडावरील रहिवाशी बंदरात पाणीविक्री करणाऱ्या निलेश दोरकूळकरने आपला पाण्याने भरलेला मोठा ट्रक त्याठिकाणी आणून ही आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तेंव्हा कुठे साधारण दीड वाजेपर्यंत किमान ८०% आग आटोक्यात आली होती. दीडच्या सुमारास दापोली नगरपंचायतीचे नगरसेवक ऋषिकेश गुजर व त्यांची टीम नगरपंचायतीचा पाण्याचा बंब घेऊन दाखल झाले. त्याने अखेर जोराच्या पाण्याच्या प्रवाहाने उरलेली आग पूर्णपणे विझवली. तोपर्यंत दुकानातील १००% सामान जळून खाक झालं होते.

# चिपळूण नागरी पतसंस्थेचा १६५४ कोटीचा व्यवसाय

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेने केवळ २८ वर्षांच्या कार्यकाळात सर्व जनमानसात एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे. मार्च २०२२ अखेर संस्थेला व्यवसायिक नफा ३० कोटी झाला असून संस्थेने १६५४ कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे.

संस्थेची मार्च २०२२ अखेर सभासद संख्या १ लाख ३१ हजार २५२, भाग भांडवल ६१ कोटी १८ लाख तर एकूण स्वनिधी ११६ कोटी १७ लाख आहे. फक्त २८ वर्षांच्या कालखंडात सभासद संख्या व भाग भांडवल व स्वनिधी वाढीमध्ये राज्यातील काही निवडक संस्थामध्ये या संस्थेचा समावेश होतो. संस्थेच्या ठेवी ८ ९९ कोटी ५५ लाख एकूण

कर्जव्यवहार ७५४ कोटी ३० लाख त्यापैकी सोनेतारण कर्ज २ ९ ४ कोटी २४ लाख तर एकूण प्लेज लोन ३३० कोटी ०६ लाख संस्थेची बँकेतील एकूण गुंतवणूक ३०३ कोटी ४१ लाख आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय १६५४ कोटीचा असुन तो २०२५ पर्यंत २५०० कोटीचा टप्पा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. मागील आर्थिक वर्षात कोरोना संसर्गामुळे सर्वत्र मंदिचे वातावरण असुनही संस्थेने व्यवसाय वाढ करण्यात व नफा क्षमतेचे सातत्य राखले आहे. कोविडच्या काळात सुध्दा संस्थेने कामकाज अखंडपणे चालु ठेवत ग्राहकांना नियोजनबध्द, नम्र व जलदसेवा दिली आहे. शासनाने ठरवुन दिलेल् प्रमाणांचा त्यांचे अंमलबजावणीसाठी नियोजनबध्द प्रयत्न केल्यामुळे सर्वच आदर्श प्रमाणांच्या बाबतीत संस्थेने यशस्वीपणे काम केले आहे.

> गेल्या काही दिवसापासून रास्तभाव दुकानांमधील ई-पॉस मशिन वारंवार बंद पडत आहेत. त्यामुळे शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरण करण्यात अडचणी येत आहेत. मात्र आम्ही विक्री रजिस्टर वरून नोंदी ठेवून कार्ड धारकांना धान्य वितरण सुरू ठेवणार आहोत. मात्र ई-पॉस मशिन तातडीने सुरू करण्याची आवश्यकता आहे.
> –अनुपम कुळकर्णी
> अध्यक्ष रास्त भाव दुकानदार संघटना, सुधागड तालुका

## देश-विदेश

# सगळ्यात जास्त भ्रष्टाचारी भाजपाच

## नाना पटोलेंचा निशाणा

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

देशात सर्वात जास्त भ्रष्टाचारी पक्ष म्हणून भाजपा ओळखले जाते, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी कोल्हापूर येथे केली.

राज्यातलं वीज संकट, शरद पवारांच्या घरावर झालेला हल्ला, भाजपा नेत्यांचे आरोप प्रत्यारोप अशा अनेक विषयांवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नरेंद्र मोदी हे भाजपाचेच पंतप्रधान आहेत, देशाचे नाहीत, अशी टीकाही केली.

कोल्हापूर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने नाना पटोले शहरात आले होते. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना अनिल देशमुखांसंदर्भातला प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा नाना पटोले म्हणाले, आम्ही सुरूवातीपासूनच सांगितलं की

सत्य पराजित हो नही सकता. त्रास होऊ शकतो. केंद्रीय तपास यंत्रणा, केंद्रातलं भाजपाचं सरकार सत्तेचा दुरुपयोग करून त्यांचा वापर करत आहे. त्यातले आज ना उद्या खरे जनतेसमोर येणारच आहे.

पटोले पुढे म्हणाले, आज जी परिस्थिती आहे, या परिस्थितीला भाजपा ज्या पद्धतीने विरोधकांना आणि केंद्रातल्या भाजपाच्या धोरणाच्या विरोधातआम्ही कोणा व्यक्तीविषयी बोलत नाही, पण त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे देश जो डबघाईला आलाय, त्याच्या विरोधात बोलणाऱ्यांवर ईडीची कारवाई करू, सीबीआय मागे लावू अशा प्रकारचं कृत्य चाललेले आहे. हे हुकुमशाहीकडे नेत आहे, हिटलरशाहीकडे नेत आहे. देशात अघोषित आणिबाणी जाहीर करण्याचं पाप केंद्रातले सरकार करत आहे. अशी टीकाही त्यांनी केली.

> भ्रष्टाचारी तर सगळ्यात जास्त भाजपाच आहे. आता भगवान श्रीरामाच्या नावाने पैसे गोळा केले, त्याचा हिशोब देणार नाहीत, आयएनएस विक्रांतच्या नावाने पैसे गोळा केले, किरीट सोमय्यांचं त्यावेळचे ट्वीट आहे, आता ते म्हणतात की आम्ही पैसे गोळा केलेच नाही.
> –नाना पटोले, प्रदेशाध्यक्ष

# राज ठाकरे यांच्याशी दानवे यांची चर्चा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी शनिवारी राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. काही दिवसांपूर्वी नितीन गडकरी आणि आता रावसाहेब दानवे यांनी राज ठाकरेंची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आल्याचे दिसत आहे. या भेटीचे नेमके कारण काय आणि राज ठाकरेंसोबत काय चर्चा झाली, याबद्दल रावसाहेब दानवे यांनी माहिती दिली आहे.

मुंबईत रेल्वेच्या जागेवर

काही झोपडपट्ट्या आहेत. या झोपडपट्ट्या हटवण्याची नोटीस सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर देण्यात आली आहे. यासंदर्भात सर्व राजकीय पक्षांनी या झोपडपट्ट्या हटवण्याची मागणी केली होती. यानंतर मी सर्वपक्षीय बैठक घेतली. त्या बैठकीत या झोपडपट्ट्या हटवू नये, असे म्हटलंय. तर, या झोपड्या हटवण्याच्या विषयासंदर्भात मी सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या भेटी घेतल्या, त्याचप्रमाणे मी राज ठाकरेंची भेट घेतली, असे रावसाहेब दानवे म्हणाले.

> राज ठाकरेंनी त्यांचं परप्रांतीयांबद्दलचं धोरण बदलल्यास भाजपा-मनसे युती होणार ही शक्यता नाकारता येत नाही. कारण जेव्हा वेगळ्या विचारधारेचे राजकीय पक्ष सोबत येतात, तेव्हा काही तडजोडी कराव्या लागतात आणि काही मुद्दे सोडून द्यावे लागतात,
> –रावसाहेब दानवे, केंद्रीय मंत्री

# तणाव कमी करण्यासाठी चार दिवसांचा आठवडा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशातील आणि जगातील अनेक कंपन्यांनी ४ दिवसाच्या आठवड्याचा प्रस्ताव कर्मचाऱ्यांसमोर मांडला असून यासाठी कर्मचारी सहमत असल्याचं रिपोर्टमध्ये सांगितलं आहे. कामाचा तणाव कमी करण्यासाठी भारतातील जास्तीत जास्त कर्मचारी यासाठी सहमत आहेत असं एका रिपोर्टमध्ये सांगण्यात आलं आहे.

६० टक्के कर्मचारी यासाठी सहमत आहेत आणि कामातील समाधान, काम आणि वैयक्तिक जीवनातील समतोल, आणि कामातून होणाऱ्या तणावाला कमी करण्यासाठी ४ दिवसांच्या आठवड्याला कर्मचाऱ्यांनी पसंती दिली आहे. दरम्यान या सर्व्हेमध्ये भाग घेतलेल्या २७ टक्के कर्मचारी म्हणाले की, यामुळे कंपनीच्या कामावर आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. तसेच ११ टक्के कर्मचारी या प्रस्तावासाठी असहमत असल्याचं आढळून आलं. ते म्हणाले की यामुळे कोणतेही साकारात्मक बदल होण्यास मदत होणार नाही त्यामुळे आम्हाला यावर वाद घालण्याची इच्छा नाही.

दरम्यान हा सर्व्हे ऑनलाईन पद्धतीने १ मार्च ते ७ मार्चच्या दरम्यान घेण्यात आला होता. यामध्ये जवळपास १११३ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये बँकिंग, अर्थ क्षेत्र, शिक्षण, अभियंता, बांधकाम, अशा बऱ्याच क्षेत्रांतील लोकांनी सहभाग घेतला होता. त्यामधील सर्व लोकांनी ४ दिवसांच्या आठवड्याला संमती दर्शवली आहे. दरम्यान तुम्ही या सुट्टीच्या दिवसाची भरपाई करण्यासाठी १२ तास काम करण्यासाठी तयार आहात का? असा प्रश्न विचारल्यावर ५६ टक्के लोक यासाठी तयार झाले आणि उरलेल्या ४४ टक्के लोकांनी १२ तास काम होईल की नाही याची खात्री नसल्याचं सांगितले. तसंच ६० टक्के लोकं सुट्ट्यांची भरपाई करण्यासाठी १२ तासांपेक्षा अधिक वेळ काम करण्यासाठी तयार असल्याचं सांगितलं. तसंच ६६ टक्के कर्मचाऱ्यांनी ४ दिवसांच्या कामामुळे उत्पादनावर साकारात्मक परिणाम होणार असल्याचा विश्वास दाखवला आहे. दरम्यान काही कर्मचाऱ्यांनी या मॉडेलचे स्वागत केले असून काही कर्मचाऱ्यांनी कामावर परिणाम होण्याच्या कारणावरुन यासाठी विरोध दर्शवला आहे.

# केंद्रीय योजनांमुळे बळीराजाला बळ

## पंतप्रधान मोदींचा विश्वास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' आणि इतर योजनातून देशातील करोडो शेतकऱ्यांना नवीन बळ मिळत आहे, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी रविवारी ट्विटरच्या माध्यमातून व्यक्त केला.

ट्विटमध्ये मोदी यांनी म्हटलं आहे की, सशक्त शेतकरी ही समृद्ध राष्ट्राची गुरुकिल्ली आहे. देशाला आपल्या शेतकरी बांधवांचा अभिमान आहे. तसेच देशातील शेतकरी अधिक सक्षम झाला तर भारत अधिकाधिक समृद्ध होईल. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि शेतीशी संबंधित इतर योजना देशातील करोडो शेतकऱ्यांना नवीन बळ मिळत आहे. देशातील ११.३ कोटी शेतकऱ्यांना या योजनांचा थेट फायदा झाला आहे, ज्यामध्ये १.८२ लाख कोटी रुपये थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. याशिवाय पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक ६,००० रुपयांची मदत मिळाली आहे. कोरोना महामारी दरम्यान १.३० लाख कोटी रुपयांची रक्कम हस्तांतरित करण्यात आली आहे. त्याचा फायदा विशेषतः मध्यमवर्गीय शेतकऱ्यांना झाला आहे. कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत कृषी संबंधित पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १ लाख कोटी कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यापैकी ११,६३२ प्रकल्पांसाठी ८,५८५ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. याशिवाय राष्ट्रीय कृषी बाजार (श-छ-च्) प्लॅटफॉर्मवर १.७३ कोटी शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. अनेकांनी जवळपास १.८७ लाख कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे, अशी माहिती पंतप्रधान मोदींनी दिली.

### राज्यपालांकडून काळाराम मंदिरात पूजा

**। नाशिक । प्रतिनिधी।**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी रविवारी रामनवमी निमित्त नाशिकच्या ऐतिहासिक काळाराम मंदिरात विधीवत पूजा करून प्रभु श्रीरामांचे दर्शन घेतले.

यावेळी नाशिकचे पालकमंत्री छगन भुजबळ,आ. राहुल ढिकले, अधिकारी व पदाधिकारी त्यांच्यासोबत उपस्थित होते. मंत्रांच्या जयघोषात काळाराम मंदिरात राज्यापालांच्या हस्ते पुजन करण्यात आले.

# शिवसेनाभवनासमोरच हनुमान चालिसाचे पठण

**॥ मनसे नेते, कार्यकर्ते पोलिसांच्या ताब्यात**

**मुंबई:** दादरमध्ये शिवसेना भवनासमोरच भोंगा लावून हनुमान चालिसा वाजवण्याचा प्रयत्न करणारे मनसे नेते यशवंत किल्लेदार यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

### वजन कमी करा अन् बोनस मिळवा

**कंपनीची कर्मचाऱ्यांसाठी खास ऑफर**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वर्क फ्रॉम होम आता खुप कॉमन झाले आहेत. त्यामुळे सर्वांना एका ठिकाणी बसून काम करावे लागत आहे. आता यातच बसणे हा नवीन स्मोकींगचा प्रकार आहे असे बोलले जाते. बसून काम करत असल्याने शरीरावर त्याचा परिणाम होऊन वजन वाढण्याची शक्यता असते. यातच झेरोधाचे सीईओ नितीन कामथ यांनी ज्यांनी जागतिक आरोग्य दिनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी एक आकर्षक ऑफर जाहीर केली. कामथ यांनी वजन कमी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बोनसचे आश्वासन दिले. यावरुन त्यांच्यावर बरीच टीका केली जात आहे.

कामथ यांच्यानुसार, ही ऑफर कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम करणार. ऑफरप्रमाणे, ज्या कर्मचाऱ्यांचा बॉडी मास इंडेक्स २५ पेक्षा कमी आहे त्यांना बोनस म्हणून अर्ध्या महिन्याचा पगार मिळेल.

महत्त्वाचे

### धम्म प्रचार कार्यक्रमाचे आयोजन

। म्हसळा । वार्ताहर ।

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा मातृशिखर संस्थेचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांच्या आदेशानुसार कोकण व रायगड जिल्ह्यात धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी चैत्यभूमीचे भंन्ते विशुद्धी बोधी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बोधी यांचा धम्माचा प्रचार व प्रसार कार्यक्रमाच्या नियोजनानुसार म्हसळा तालुक्यातील बौद्ध वाडीवस्तीत ९ ते १३ एप्रिल या पाच दिवसांत कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

### तळा शहरातील गुरे चोरीला

**तळा :** तळा शहरातील वडाची वाडी (पारधी आळी) येथील हिरु जानू पवार यांची तीन गुरे चोरीला गेल्याची घटना घडली आहे. चोरी झालेल्या गुरांमध्ये एक दुभती गाय व दोन नांगराच्या बैलांचा समावेश आहे. हिरु पवार यांनी नेहमीप्रमाणे आपली तिन्ही गुरे पाणी पिण्यासाठी व चरण्यासाठी सोडली होती. गुरे सोडल्यानंतर सायंकाळी सात वाजता नेहमीप्रमाणे त्यांना ते आणायला गेले असता त्यांची गुरे त्यांना सापडली नाहीत. बराच वेळ शोध घेतला असतानादेखील आढळून आले नाहीत. आपली गुरे चोरीला गेल्याची त्यांना खात्री पटली. त्यांनी तातडीने तळा पोलीस ठाणे गाठत याबाबतची माहिती पोलिसांना दिली व आपली गुरे शोधून द्यावी, असे निवेदनही दिले आहे.

# 'ऑईल आले वाहून'-मुरुडमध्ये प्रदूषण

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

मुरूड समुद्रकिनाऱ्यावर शनिवारी सायंकाळपासून ऑइलमिश्रित गोळे वाहून आल्याने किनारा विद्रूप बनला आहे.सायंकाळी सातनंतर ही घटना समोर आली असून, किनाऱ्यावर फिरण्यास आलेल्या पर्यटकांसह स्थानिक नागरिकांच्या चपला आणि पायांना हे ऑईलचे गोळे चिकटल्याने सर्वजण हैराण झाले आहेत. समुद्रात टाकण्यात आलेले खराब ऑईलचे लाटांमुळे निर्माण झालेले छोटे-छोटे गोळे आणि धब्बे पाण्याबरोबर किनाऱ्यावर पसरले आहेत.

बंदर मार्गावरील हिरा रेसिडेंनसीचे मालक महेंद्र पाटील यांनी सांगितले की, शनिवार उशिरा समोरील समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेलेल्या पर्यटकांनी चप्पल आणि बुटांना हे गोळे चिकटल्याची माहिती प्रथम दिली. मुंबई ते गोवा हा प्रमुख समुद्र जलमार्ग मुरूड समुद्र किनाऱ्यासमोरून जातो. त्यामुळे मोठ्या जहाजांची खोल समुद्रातून वाहतूक सुरू असते. या जहाजांतून खराब झालेलं ऑइल समुद्रात टाकले जाते. समुद्र पोटात काहीच ठेवत नाही. त्यामुळे हे ऑइल गोळ्यांच्या रूपाने समुद्रकिनारी आल्याची माहिती मिळाली. हा प्रकार म्हणजे, समुद्रातील प्रदूषणच आहे. या प्रदूषणामुळे मासळीचे उत्पादनदेखील खूपच घटले आहे. तसेच किनारादेखील विद्रूप दिसून येत आहे.

रायगड जिल्हा मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष मनोहर बैले यांनी रविवारी बोलताना सांगितले की, ओनजीसी कंपनीची तेल पाईपलाईन समुद्रातून उरणकडे गेलेली आहे. त्यामुळे गळतीदेखील होऊ शकते किंवा समुद्रातून जाणारी मोठी जहाजे खराब झालेले ऑइल समुद्रात सोडतात, त्यामुळे किनाऱ्यावर ऑईलचे गोळे किंवा तवंग पसरतो. परंतु, समुद्रात ऑइल पसरणे खूपच घातक ठरत असते. किनारादेखील विद्रूप होतो. मासळीचा नाश होऊ शकतो. सातत्याने संकटे येत असल्याने मच्छिमार हैराण असून, ऑइलमुळे अजून एक संकट घोंगावत आहे.

## सोमय्यांच्या पुतळ्याचे दहन

। पनवेल । वार्ताहर ।

संजय राऊत यांच्या वरील ईडी कारवाईचा निषेध म्हणून पनवेलमध्ये शिवसेना कार्यालयाजवळ शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली ईडीचा गैरवापर करणाऱ्या सोमय्या यांचा निषेध करून त्यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

यावेळी शिरीष घरत, रामदास पाटील, भरत पाटील, दीपक निकम, प्रदीप ठाकूर, रामदास शेवाळे, योगेश तांडेल, गुरुनाथ पाटील, रघुनाथ पाटील, दीपक घरत, कल्पना पाटील, प्रमुख प्रवीण जाधव, सदानंद शिर्के, राकेश गोवारी, यतीन देशमुख, डी. एन.मिश्रा, अवचित राऊत, पराग मोहिते, ज्ञानेश्वर भंडारी, अपूर्वा प्रभू यांच्यासह पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागोठण्यात आरोग्य जनजागृती अभियान

। नागोठणे । वार्ताहर ।

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नागोठणे शहर महिला आघाडीतर्फे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रतिभा आरोग्य जनजागृती अभियान राबविण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य शिरसाट व त्यांच्या टीमने उपस्थित महिलांची आरोग्य व रक्त तपासणी केली. या शिबिरात रक्तदाब, हिमोग्लोबिन, जीवनसत्त्वे अशा प्रकारच्या तपासण्यांचा सुमारे ४० महिलांनी लाभ घेतला. यावेळी आशा शिर्के, अमिता शिंदे, रिचा धात्रक, सुजाता जवके, प्रतिभा तेरडे, राजश्री टके, सुनिता तटकरे, डॉ. दानिया अधिकारी, हिरामण डोलकर, रमेश हंबीर, नमिता म्हात्रे, भावना महाले आदी उपस्थित होत्या.

### राष्ट्रवादीची सोमवारी संवाद यात्रा

। उरण । वार्ताहर ।

उरणमधील समस्या तसेच इतर प्रश्न जाणून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे परिवार संवाद यात्रा सोमवार, दि. ११ एप्रिल रोजी उरणमध्ये आयोजित करण्यात आल्याची माहिती प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील यांनी दिली. यात्रेसंदर्भातील माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या परिवार संवाद यात्रेत जलसंपदामंत्री तथा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या यात्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असा विश्वास प्रशांत पाटील यांनी व्यक्त केला.

## मुरुड पोलीस राहताहेत भाड्याच्या घरात

॥ इमारतींकडे शासनाचे दुर्लक्ष

॥ रहिवासी दुरूस्तीच्या प्रतीक्षेत

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड पोलीस ठाण्याजवळ पोलिसांना राहण्याकरिता २७ खोल्या असून, त्या खोल्यांची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे पोलिसांना भाड्याच्या घरात राहण्याची वेळ आल्याची माहिती पोलीस निरीक्षक गवारे यांनी दिली.

मुरुड पोलीस ठाणे हे नावाबकालीन असल्याने त्या इमारतींना १०० वर्षे होऊन गेलीत. तर, मुरुड जेलचे १५० वर्षांपूर्वीचे दगडी बांधकाम आहे. जेलची गेली अनेक वर्षे दुरुस्ती झालेली नाही. पोलीस ठाण्याची मुख्य इमारतदेखील फार जुनी आहे. पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्याकरिता २७ खोल्या असून, त्या खोल्यांची अवस्था धोकादायक आहे. त्यामुळे पोलीस आपल्या परिवारासह आपला जीव मुठीत घेऊन राहात आहेत. बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. देखभालीअभावी वसाहत धोकादायक बनल्या आहेत. या इमारतींची सर्व दुरुस्ती कामे पावसाळा येण्यापूर्वीच व्हावी, अशी मागणी पोलिसांकडून होत आहे.

इमारती खूप जुन्या असल्याने आमच्याकडून सार्वजनिक बांधकाम खात्याकडे दुरुस्तीचे प्रस्ताव अनेक वेळा गेले आहेत. दुरुस्ती व नूतन इमारतीचे कामाचे अधिकार सार्वजनिक बांधकाम खात्याकडे असल्याने ते लवकरात लवकर काम होण्याच्या आम्ही प्रतीक्षेत आहोत. माझ्या पोलिसांना राहण्याची चांगली सुविधा नसल्याने गावात खासगी घर भाड्याने घेऊन राहावे लागते.

– नितीन गवारे, पोलीस निरीक्षक, मुरुड

जानेवारी २०२२ ला सर्व इमारतींच्या दुरुस्तीकामाचे अंदाजपत्रक बनून शासनाकडे पाठवण्यात आले आहे. अंदाजे ३० लाखांचे काम आहे. परंतु, निधीअभावे काम रखडले आहे. यावर्षी लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा करून शासनाच निधी वर्ग केल्यास पावसाळ्याआधी दुरुस्तीचे काम करण्याचा प्रयत्न करू.

– अक्षय माने, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

## श्री बेलजाई मातेचा पालखी सोहळा

। सुकेळी । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील नागोठणे जवळच असलेल्या बाळसई येथे श्री बेलजाई मातेचा पालखी सोहळा तिथीनुसार दि. ६ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात सर्व बाळसई ग्रामस्थांच्या उपस्थितीत तसेच पाली येथिल पुरोहित गद्रे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी होमहवन, मूर्तीवर अभिषेक तसेच श्री बेलजाई मातेची पूजा करण्यात आली.

या सोहळ्यासाठी नोकरी-व्यवसायानिमित्त मुंबई, ठाणे व इतरत्र असलेले बाळसईतील तरुणवर्ग, नागरिक तसेच माहेरवाशिणी या दरवर्षी आवर्जून उपस्थित राहतात. मिरवणूक सोहळा रात्री ८.३० वाजता बेलजाई मातेच्या मंदिरात पोहोचल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### रस्त्याची दुरवस्था; प्रवाशांचे हाल

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग-रेवदंडा या मुख्य रस्त्याची खारगल्ली ते पालव फाट्यादरम्यान दुरवस्था झाली आहे. याठिकाणी काही महिन्यांपूर्वी केलेली डांबराची डागडुजी आता उद्ध्वस्त झाली असून, रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे तसेच वाहनचालकांचेही हाल होत आहेत. त्यामुळे पावसाळ्याआधी या रस्त्यावर नव्याने डांबराची कोटींग करावी, अशी मागणी वाहन चालकांसह प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## 'आगामी सण, उत्सव शांततेत साजरे करा'

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये आगामी काळात साजरे करण्यात येणारे सण, उत्सव शांततेत आणि शासनाच्या अटी-शर्तींचे पालन करुन साजरे करावेत, असे आवाहन नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी केले आहे.

नागोठणे पोलीस ठाण्यात शुक्रवारी ८ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता आयोजित शांतता समितीच्या बैठकीत नारनवर बोलत होते. यावेळी भाई टके, विलास चौलकर, हिरामण कोकाटे, मारुती शिर्के, ज्ञानेश्वर शिर्के, सुनील लाड, ज्ञानेश्वर सांळुखे, राजेश पिंपळे, नितीन राऊत, विक्रांत घासे, गणपत डाकी, योगेश ठाकूर, मंगेश कामथे, रुपेश नागोठणेकर, प्रथमेश काळे, दिनेश घाग, प्रमोद नागोठणेकर, पो.ह. विनोद पाटील यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

नागोठणे हद्दीत आगामी काळात श्रीराम नवमी, महावीर जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, हनुमान जयंती तसेच पळसाई माता पालखी सोहळा, जोगेश्वरी माता पालखी सोहळा आदी उत्सव साजरे करण्यात येणार आहेत.

## उरण शहराला दूषित पाणीपुरवठा

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात

। उरण । वार्ताहर ।

उरण शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनमधून शनिवारी सकाळपासून दूषित पाण्याचा पुरवठा सुरू होता. यासंदर्भात विचारणा करण्याचा प्रयत्न केला असता सुट्टी असल्याने संपर्क होऊ शकला नाही. या दूषित पाण्यामुळे जनतेचे आरोग्य बिघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शनिवारी सकाळी पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा सुरू केला, त्यावेळी नळातून काळेमिश्रित पाणी येत असल्याचे निदर्शनास आले. हे पाणी ज्याप्रमाणे गटाराचे पाणी असते, त्याचप्रमाणे दिसत होते, तसेच पाण्याला उग्र वास येत होता. अशा पिण्यालायक नसलेल्या दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

याबाबत नगरपालिका कार्यालयाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता सुट्टी असल्याने होऊ शकला नाही. मात्र, जर शहरात अशा प्रकारचा दूषित पाणीपुरवठा होऊ लागला, तर हे दूषित पाणी पिऊन शहरातील जनतेला साथीच्या आजाराचा सामना करण्याची शक्यता डॉक्टरांनी वर्तवली आहे. अशाप्रकारे दूषित पाणी देऊन आरोग्य बिघडविण्याचे काम नगरपालिका करीत असल्याचा आरोप जनतेनेकडून केला जात आहे. या गंभीर बाबीकडे तात्काळ लक्ष घालण्याची मागणी जनतेतून होत आहे.

## शाळापूर्व उपक्रमाला पालकांचाही सहभाग

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये शाळापूर्व तयारी उपक्रमानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून शिक्षण कसे आवश्यक आहे याची जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी काढलेल्या या उपक्रमात पालकदेखील सहभागी झाले होते.

माणगाव तर्फे वरेडी येथील जिल्हा परिषद शाळेत शाळापूर्व तयारी उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढली. शिक्षण सर्वांसाठी महत्त्वाचे असून, पात्र विद्यार्थी आणि पालक यांनीदेखील सहभाग घेत जनजागृती केली. प्रभातफेरी काढण्याआधी शाळेच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायतीचे सरपंच कल्याणी कारले यांनी प्रतिमा पूजन केले. त्यावेळी ग्रामपंचायतीचे तानाजी टोकरे, ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र कराळे, शरद देशमुख, रामदास हिलाल, यशवंत हिलम, शोभा घारे आदी उपस्थित होते.

*माणगाव तर्फे वरेडी शाळेकडून जनजागृती*

या जनजागृती अभियानाला कर्जत पंचायत समितीमधील साधन व्यक्ती गायकवाड आणि राणे यांनी भेट दिली. यावेळी सर्व शालेय विद्यार्थ्यांना १०० टक्के गणवेश टाय-बेल्ट उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती यांचे कौतुक केले. शाळेचे मुख्यध्यापक दिलीप घुले यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी प्रशिक्षण दिले.

### 'दुकानांवरील पाट्या मराठीत असाव्यात'

। कर्जत । वार्ताहर ।

माथेरानमधील दुकने तसेच हॉटेलचे नामफलक मराठीत करावे याकरिता माथेरान मनसेचे अध्यक्ष संतोष कदम यांनी माथेरानचे अधीक्षक तसेच मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे. गेल्या काही महिन्यांपासून राज्य शासनाने दुकानांवरील फलक हे मराठीत असावेत, असा अध्यादेश काढला आहे. परंतु, आजही माथेरानमध्ये काही दुकानदार तसेच हॉटेल चालक यांचे नामफलक इंग्रजी तसेच इतर भाषेत असून, ते मराठी भाषेत करावेत अशा सूचना कराव्यात, अशी मागणी मनसेने निवेदन देऊन केली आहे. यावर मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे यांनी महाराष्ट्र दिनापूर्वी सर्व पाट्या मराठीत करण्यात येतील, असे आश्वासन कदम यांना दिले आहे.

## अंजुमन हायस्कूलमध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन

। म्हसळा । वार्ताहर ।

मुस्लिम समाजाचा पवित्र असा रमजान महिना सुरु झाला. पहाटेपासून सायंकाळी सात वाजेपर्यंत पूर्णपणे उपवास (रोजा) बाळगून सायंकाळी रोजा सोडला जातो. दरम्यानच्या कालावधीत पाण्याचा थेंबही घेतला जात नाही. सायंकाळी सात वाजता कुटुंबीय, मित्र मंडळींसह पाण्यासोबत प्रथम खजूर खाऊन रोजा सोडला जातो. अंजुमन इ इस्लाम हायस्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळाचे प्रा. तांबे यांनी मुस्लिम बांधवांना हिंदू बांधवांसमवेत रोजा सोडण्याचा नियोजन करून सर्वधर्मसमभावाची आठवण द्विगुणित केली. याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी मंगेश साळी, प्राचार्य तांबे, केंद्रप्रमुख अनिल ठाकूर, बांगी सर, मतीन फणसे, नितिन माळीपरगे, नंदाफ सर, संजय गोरेगावकर आदी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- WORK FROM HOME 8975956964
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- अलिबाग चोंढी येथे कामासाठी माणसे पाहिजेत. फोन नं.८२०८४५९४२४
- अलिबाग शेतकरी भवन जवळ वन बीएचके अलिशान फ्लॅट विकणे आहे. संपर्क : ८७८८१८५३७३/९२२०८४०३८८
- पाहिजेत. पेणमध्ये हॉटेलमध्ये कामासाठी चपातीवाला, वेटर, मोरीवाला हे कामगार पाहिजेत. संपर्क मो. ८४१२९२१६६६, ९४२२६९४३१३
- अलिबाग मधील ऑफिस करीता ऑर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे मोबाईल नंबर ८००७४५२१४६
- खारघर नवी मुंबई येथे घरकामासाठी बाई/मुलगी पाहिजे. संपर्क :- ९७३०७५९४५५/७९७७९०३३२६
- सहाण बायपास येथे रोडटच जागा भाड्याने देणे आहे. ९८२३९८६७४५/८६५५३७०५४१

जाहिरातीसाठी संपर्क

## शाळेत विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट

### नेवाळी जि.प. शाळेत विविध उपक्रम

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील वाकस ग्रामपंचायतीमधील नेवाळी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक गोडी निर्माण व्हावी यासाठी सेल्फी पॉईंट बनविण्यात आले आहेत. शाळापूर्व तयारी उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष २२-२३ शाळापूर्व तयारीसाठी इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या बालकांची पूर्वतयारी म्हणून शासनाने शिक्षण विभागाने राबविलेल्या उपक्रमास नेवाळी येथील जिल्हा परिषद शाळेत शाळापूर्व तयारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या पटांगणात दर्शनी भागात सेल्फी पॉईंट बनविण्यात आला आहे. नवीन विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांची कार्यक्रमास उपस्थिती होती. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंदू दुर्गे, सदस्य हरिश्चंद्र भागीत, सदस्या प्रिया भागीत, ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अशोक पेमारे, अंगणवाडी सेविका मदतनीस यांचीदेखील उपस्थिती होती. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती चाम्बावने, शाळेतील शिक्षक नरेश कोर, संजय थोरात आणि मनस्वी पाटील आदींनी नियोजन केले होते. या मेळाव्याला शिक्षण विभागाचे केंद्रप्रमुख रवींद्र पष्टे, अन्य शाळेच्या शिक्षिका अश्विनी थोरात यांनी पालकांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# आंबेत रस्त्याचा तिढा अखेर सुटला

## तब्बल वीस वर्षांच्या प्रतीक्षेनंतर गावातील रस्त्याला नागरिकांचा हिरवा कंदील

**। आंबेत । वार्ताहर ।**

राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. ए.आर. अंतुले यांच्या आंबेत गावात गेली वीस वर्षे अंतर्गत रस्तेच झाले नाहीत. मात्र, तब्बल वीस वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मंजूर करण्यात आलेला आंबेत मोहल्ल्यातील अंतर्गत रस्ता हा पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. मात्र, ग्रामस्थांच्या तर्क-वितर्कांना बाजूला करत गावातील समाजकार्याला पुढे घेऊन जाण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच गावकऱ्यांनी अखेर या कामाला हिरवा कंदील दाखवला. त्यामुळे हा रस्ता होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गावाच्या विकासात्मक दृष्टीकोनातून गावकऱ्यांनी योग्य भूमिका घेतली आहे. आलेल्या रस्त्याच्या निधीवरून तसेच नक्की कोणत्या ठिकाणी रस्ता करावा याबाबत निर्माण झालेला संभ्रम हा एकत्रितपणे येऊन गावकऱ्यांनी एकोपा दाखवत मार्गी लावला. यामुळेच आज या रस्त्याचे काम पूर्वपदावर सुरु करण्यात आल आहे. दुसरीकडे संबंधित ठेकेदारानेदेखील गावकऱ्यांच्या विश्वासाला तडा न जाता योग्य काम करावे, हीच अपेक्षा.

– आफ्रोजा डावरे, सरपंच, आंबेत

गावात अनेक अंतर्गत रस्ते असून, सद्यःस्थितीत वर्ग झालेला निधी हा कोणत्या रस्त्याला वापरावा यावरून मागील काही दिवस हा वाद पेटला होता. शेवटी २८० मीटर लांबीच्या या रस्त्याला गावकऱ्यांनी वाद न करता हिरवा कंदील दाखवला. मात्र, या गावातील गेली कित्येक वर्षे रखडलेले बाकी उर्वरित रस्ते कधी मार्गी लागणार, असा खोचक सवालदेखील गावकरी आणि स्थानिक नागरिक करीत आहेत. तत्कालीन खासदार स्वर्गवासी अंतुले यांनी त्यांच्या कारकीर्दीत सन २००९ साली आपल्या निधीतून या गावाला रस्ता सुविधा उपलब्ध करून दिली होती.

## महिलांना कोंबडीच्या पिल्लांचे वाटप

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

उरण पंचायत समिती सेस फंडांतर्गत ग्रामीण भागांतील महिलांचे सक्षमीकरण व्हावे, म्हणून ५० टक्के अनुदानातून उरणमधील वशेणी,सारडे आवरे, खोपटे आदी गावांतील ४७ महिलांना कावेरी या सुधारित जातीची एकूण प्रत्येकी ५० एकदिवसीय कोंबडीच्या पिल्लांचे वाटप करण्यात आले. हे वाटप गट शिक्षणाधिकारी के.बी. अंजने व सभापती समिधा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यक्रमास पशुधन अधिकारी डॉ. अनिल धांडे, डॉ. सचिन भोसले, डॉ. सोमनाथ डाबेराव, माजी उपसभापती महादेव बंडा, वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कार्यवाह मच्छिंद्र म्हात्रे, प्रवीण मोकल, गोंधळी सर आणि योजनेचे लाभार्थी आदी उपस्थित होते. उपस्थित लाभार्थ्यांना यावेळी डॉ. अनिल धांडे यांनी कोंबडीच्या छोट्या पिलांची काळजी कशी घ्यावी याबाबत माहिती दिली. वशेणीमधील पाच महिला लाभार्थ्यांची ५० टक्के रक्कम ही वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कार्यवाह मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी स्वतः शासनास प्रदान केल्याने परिसरात त्यांचे कौतुक होत आहे.

## 'भीमाचे वारसदार' या गाण्याचे लोकार्पण

### 'प्रशिक फिल्म प्रोडक्शन'ची अनोखी भेट

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

प्रशिक फिल्म प्रोडक्शन निर्मित 'भीमाचे वारसदार' या गाण्याचे शनिवारी आंबेडकराईट नेशन या युट्युब चॅनेलवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

बाबासाहेबांचे वारसदार याना शोभेल असे गाणे हे कुंदन जाधव आणि त्यांचे सहकारी प्रवीण साळुंखे यांनी लिहिले असून, गाण्याची चालदेखील कुंदन जाधव यांनी संगीतबद्ध केली आहे. १४ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देश व जगभरात मोठ्या धूमधडाक्यात साजरी होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'प्रशिक फिल्म प्रोडक्शन'ने अनोखी भेट दिली आहे. हे गाणे 'झी युवा सिंगर' फेम चेतन लोखंडे यांनी गायले असून, या गाण्याला व्हिडिओच्या माध्यमातून विशाल कांबळे यांनी कोरिओग्राफ केले. संगीत संयोजन हे सुशील पेंढारी यांनी केले असल्याची माहिती कुंदन जाधव यांनी दिली आहे. या गाण्याच्या लोकार्पणप्रसंगी प्रशिक फिल्म प्रोडक्शनचे संस्थापक कुंदन जाधव, आकाश कांबळे, ॲड. मनीषा तायडे तसेच प्रशिक कला मंचची सर्व टीम उपस्थित होती.

## आदिवासींना दाखल्यांचे वाटप

**। म्हसळा । वार्ताहर ।**

मेंदडीकोंड येथे कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत आदिवासी बांधवांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार समिर घारे यांच्या कल्पनेतून तहसील कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी मंडळ अधिकारी रवींद्र उभारे, तलाठी गजानन गिरी, सर्व विभागातील तलाठी, सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, कोतवाल, गाव अध्यक्ष, आदिवासी लाभार्थी आदी मान्यवर उपस्थित होते. खामगाव परिसरातील एकूण ७७ कुटुंबांतील आदिवासी बांधवांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. यामध्ये २६ कुटुंबांना जातीचे दाखले, ६२ कुटुंबांना उत्पन्न दाखले, ८६ कुटुंबांना वय अधिवास दाखले, ३० कुटुंबांना आधार कार्ड वाटप तर ५ कुटुंबांना शिधापत्रिका वाटप करण्यात आले.

## पवारांच्या घरावरील हल्ल्याचा निषेध

### तहसीलदारांना निवेदन

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या मुंबई येथील निवासस्थानी अज्ञात जमावाकडून हल्ला झाला. या भ्याड हल्ल्याचा सुधागड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे शनिवारी (ता.९) जाहीर निषेध करण्यात आला. तसेच हल्लेखोरांवर योग्य कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या संबंधित निवेदन सुधागड पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांना देण्यात आले.

यावेळीसुधागडतालुकाराष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष रमेश साळुंखे, पाली नगराध्यक्ष गीता पालरेचा, ग. रा. म्हात्रे, पाली शहर अध्यक्ष अभिजीत चांदोरकर, सुधागड तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष संदेश शेवाळे, साक्षी दिघे, रूपाली भणगे, प्रकाश कारखानीस, साधुराम साजेकर, सुलतान बेनसेकर, सुधाकर मोरे, आशिक मणियार, सुधीर भालेराव, सुशील शिंदे, किरण खंडागळे, सचिन मोरे, इम्तियाज पठाण, कमलाकर शिंदे, पप्पू परबलकर, इसाक पानसरे, किरण चव्हाण, डॉ. जयंत जाधव, डी. सी.चव्हाण, सुनील राऊत, रुचिता बेलोसे, रचना जाधव व सूरज मेंडन आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सफाई कामगाराचा प्रामाणिकपणा

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमधील कचरा संकलन करणाऱ्या महिला सफाई कर्मचारी यांनी संकलित करून जमा झालेल्या कचऱ्यात दहा हजारांची रोख रक्कम मिळाली. ही मिळालेली रोख रक्कम त्यांनी सर्व शहानिशा करून मूळ मालकाला परत करत आपल्या प्रामाणिकपणाचे दर्शन घडविले आहे. येथील नगरपरिषदेच्या दैनंदिन सफाई कर्मचारी कमल गायकवाड या दररोज घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा संकलन करण्याचे काम करतात. त्यांना दि. ७ रोजी कचरा संकलन करतेवेळी तब्बल दहा हजार रुपयांची रोख रक्कम मिळाली. ही सापडलेली रक्कम त्यांनी प्रामाणिकपणे मूळ मालकाला परत केली. त्यांच्या या प्रामाणिकपणाचे सर्व माथेरानमधून कौतुक करण्यात येत आहे.

## 'हिरवळ'कडून घरगुती गॅस सुरक्षा कार्यशाळा

**। माणगाव । वार्ताहर ।**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाड येथे दि. ८ एप्रिल रोजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता घरगुती गॅस सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांतर्गत सूर्या गॅस सुरक्षा कंपनीतर्फे ट्रेनर विलास शिरवाळे, शिवाजी बाबर यांनी घरगुती गॅस वापरताना कोणती काळजी घ्यावी व कशी काळजी घ्यावी यावर प्रात्यक्षिक दाखविले, तसेच घरगुती गॅस वापरताना आपल्याकडून होणाऱ्या चुका व कळत-नकळत होणारे दुर्लक्ष यामुळे संभवणाऱ्या अपघातांबद्दल माहिती देऊन ते अपघात कसे टाळता येतील यावर मार्गदर्शन केले.त्यामध्ये त्यांनी सिलिंडर टाकीवर लिहिलेल्या सूचनांचे पालन करावे, सिलिंडर घेताना त्यावरील एक्सपायरी डेट बघून घ्यावी व सिलिंडरच्या नॉबमध्ये थोडे पाणी टाकून बुडबुडे येत आहेत का ते तपासावे, जेणेकरून टाकी लिक असेल तर लगेच लक्षात येईल असे मार्गदर्शन केले, तसेच गॅस शेगडी कधीही साबणाने साफ करू नये ती खराब होण्याची शक्यता असते, दर सहा महिन्यांनी रेगुलेटर तपासून घ्यावा व दर पाच वर्षांनी रेगुलेटर व गॅस पाईप बदलून घ्यावा, अशा महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. प्रा. सुदेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया व संचालिका सोनाली धारिया यांच्या मार्गदरशनाखाली आणि प्रोत्साहनाने महाविद्यालयात नवनवीन उपक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच संस्थेच्या प्रमुख सल्लगार डॉ. संध्या कुलकर्णी यांनीदेखील अशा प्रकारचे कार्यक्रम महाविद्यालयात नियमितपणे आयोजित केले जावे याकरिता मार्गदर्शन केले.

## बौद्ध महासभेच्या जिल्हा कार्यकारिणीची निवड

**। रसायनी । वार्ताहर ।**

भारतीय बौद्ध महासभा रायगड जिल्हा (उत्तर) नूतन कार्यकारिणीची निवड रसायनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे पार पडली. यावेळी जगदीश गवई (भारतीय बौद्ध महासभा केंद्रीय राष्ट्रीय महासचिव), भिकाजी कांबळे (भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र, अध्यक्ष), सुशील वाघमारे (महाराष्ट्र सरचिटणीस, रायगड जिल्हा पालक मंत्री) उपस्थित होते. ही निवड पुढील तीन वर्षांकरिता असणार आहे.

या कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी विजय गायकवाड, सरचिटणीस विजय कांबळे, कोषाध्यक्ष उषाताई कांबळे, उपाध्यक्ष (संस्कार)-राजेश भालेराव, उपाध्यक्ष (महिला)-सुनंदा वाघमारे, उपाध्यक्ष (प्रचार पर्यटन)-गणेश कांबळे, उपाध्यक्ष (संरक्षण) व कार्यालयीन सचिव -अरुणा शिवशरण आदींचा समावेश करण्यात आला आहे.

## फीवाढीविरोधात पालक आक्रमक

**। उरण । वार्ताहर ।**

जेएनपीटी, आरकेएफ मॅनेजमेंट आणि पालक, शिक्षक यांची संयुक्त बैठक जेएनपीटीचे मुख्य व्यवस्थापकीय अधिकारी जयवंत ढवळे यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. यावेळी जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयाच्या नव्याने आलेल्या आरकेएफ मॅनेजमेंटला फीवाढीबद्दल माजी आमदार मनोहर भोईर यांनी ठणकावले.

यावेळी त्यांनी सांगितले की, ही शाळा जेएनपीटीच्या कामगारांची मुले आणि प्रकल्पग्रस्त आणि स्थानिक भूमीपुत्रांच्या मुलांसाठी निर्माण झाली आहे. या ठिकाणी हे शिक्षण देताना, आहे त्या स्थितीत चालवा, नसेल परवडत तर परत जा, आम्ही आणि जेएनपीटी पाहून घेऊ, असे ठणकावून सांगितले. फीवाढीविरोधात रस्त्यावर उतरुन आवाज उठविला जाईल, असेही ते म्हणाले. यावेळी जेएनपीटीचे विश्वस्त कॉ. भूषण पाटील, विश्वस्त दिनेश पाटील, वींद्र पाटील, जि.प. सदस्य विजय भोईर, गणेश घरत, संतोष पवार शिक्षक नेते नरसू पाटील, पालक संघ अध्यक्ष किरण घरत, अविनाश पाटील, प्रवीण पाटील, शिक्षक आणि पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, १. श्री. गोपाल नंदलाल राजानी व २. श्री. नयन जसजीत ठक्कर हे आमच्या अशिलांसमवेत स्पष्ट व विपणनयोग्य हक्क, सर्व दावे, मागण्या व भारांपासून मुक्त अशा मोजमापित २७.२६ आर अर्थात २७२६ चौ. मी. वा जवळपास क्षेत्रफळाच्या पूर्ण स्वामित्वाचा शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. २९२+२९३, हिस्सा क्र. २ (गट क्र.२९२+२९३ चा भाग बनत असलेले), गाव तळवडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड व नोंदणीकरण जिल्हा रायगड व नोंदणीकरण उपजिल्हा अलीबाग येथील, जिल्हा परिषद रायगडच्या स्थानिक हद्दीतील, पंचायत समिती अलिबाग व ग्रामपंचायत परहूर या जागेच्या (यापुढे सदर प्रथम जमीन म्हणून उल्लेखित), त्यावरील ग्रामपंचायत परहूर घर क्र. ८३ (यापुढे सदर घर म्हणून उल्लेखित) या विवरणाच्या मालमत्तेच्या (सदर प्रथम जमीन व सदर घर हे यापुढे सदर प्रथम मालमत्ता म्हणून उल्लेखित) विक्री करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

पुढे सूचना देण्यात येत आहे की, १. डॉ. मालिनी मनसुखानी लौड व २. डॉ. गौतम विनायक लौड हे आमच्या अशिलांसमवेत स्पष्ट व विपणनयोग्य हक्क, सर्व दावे, मागण्या व भारांपासून मुक्त अशा मोजमापित २१.४२ आर अर्थात २१४२ चौ. मी. वा जवळपास क्षेत्रफळाच्या पूर्ण स्वामित्वाचा शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गट क्र. २९२+२९३, हिस्सा क्र. ३ (गट क्र. २९२+२९३ चा भाग बनत असलेले), गाव तळवडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड व नोंदणीकरण जिल्हा रायगड व नोंदणीकरण उपजिल्हा अलिबाग येथील, जिल्हा परिषद रायगडच्या स्थानिक हद्दीतील, पंचायत समिती अलिबाग व ग्रामपंचायत परहूर या जागेची (यापुढे सदर द्वितीय मालमत्ता म्हणून उल्लेखित) विक्री करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

कोणाही व्यक्तीचा सदर प्रथम व /वा सदर द्वितीय मालमत्ता वा त्यांच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, विनिमय, गहाण, प्रभार, भेट, न्यास, उत्तराधिकार, ताबा, कब्जा, वहिवाट, उप-वहिवाट, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, देखभाल तत्वावर, धारणाधिकार, देखभाल, सुविधाधिकार, इच्छापत्र, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, कुटुंबव्यवस्था/तडजोड, दावाखटला, कोणत्याही विधि न्यायालय, न्यायाधिकरण, प्राधिकारी, वैधानिक मंडळ वा लवाद यांचा निवाडा/आदेश/हुकूम, कोणतेही दस्तावेज/लिखित बाबी वा अन्य कोणतेही भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागण्या असल्यास त्यांनी सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत संलग्न सहाय्यक कागदपत्रांच्या प्रतींसमवेत अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात त्यांचे कार्यालय पत्ता रेडीमनी मॅन्शन, ४३, वीर नरिमन मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे सूचित करावे अन्यथा असा हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा व/वा मागणी, काही असल्यास ते अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

दिनांक : ११.०४.२०२२

**कांगा ॲन्ड कंपनी**
सही/-
**श्री. ऋषिराज पी. भट्ट**
भागीदार
वकील व सॉलिसिटर्स

## माथेरानमध्ये पोलिसांचे पथसंचलन

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान हे पर्यटनस्थळ असून, येथे येणाऱ्या पर्यटकांना कोणताही त्रास होऊ नये, तसेच आगामी काळात साजरे करण्यात येणारे सण विचारात घेऊन माथेरान पोलिसांनी येथे पथसंचलनाने शक्ती प्रदर्शन केले.

या महिन्यात रमजानसारखा पवित्र महिना आणि हनुमान जयंती या सर्व सणांदरम्यान कोणातही अनुचित प्रकार घडू नये तसेच येथील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून येणाऱ्या पर्यटकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी माथेरान पोलीस दलाने पोलीस ठाणे ते माथेरानचे मध्यवर्ती ठिकाण श्रीराम मंदिर तेथून छत्रपती शिवाजी महाराज नगर, पंचवटी नगर, संत रोहिदास नगर, मुस्लिम मोहल्ला, इंदिरा गांधी नगर तसेच दस्तुरीपर्यंत पथसंचलन केले. येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथसंचलन करण्यात आले.

## लोहोप दांडवाडीतील महिलांना शिवणकलेचे प्रशिक्षण

**। रसायनी । वार्ताहर ।**

महिलांनी स्वत:च्या पायावर उभे राहावे या उद्दात विचारांतून सेवा सोशल सर्व्हिस सोसायटी यांच्या माध्यमातून लोहोप दांडवाडी येथील आदिवासी महिलांना शिवण कलेचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामुळे महिलांना रोजगाराचे साधन निर्माण झाले आहे.

यासाठी चार शिलाई मशीन उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, हा कोर्स तीन महिने कालावधीचा असणार आहे. त्यासाठी एक प्रशिक्षक नेमण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ सोनू सॅम यांच्या हस्ते करण्यात आला. महिला वर्ग हा व्यवसाय शिकल्यानंतर त्यांना सहज रोजगार उपलब्ध होईल आणि आपल्या संसाराला हातभार लागेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी फादर जस्टिन, लिजोय जोसेफ (प्रोग्राम मॅनेजर) प्रकल्प समन्वयक मंगेश भंडारे, ट्रेनर सपना भंडारे व सहकारी वासंती धांदूत, कांचन सावंत, सूरज कानोजोया आदी उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्यज्वेलकलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## वाहतूक कोंडीबाबत मनसे आक्रमक

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

डीएव्ही स्कूल आणि होरिझन स्कूल येथे शाळा चालू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळात शाळेच्या आवारात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्याचा नाहक त्रास शाळेतील लहान मुले व त्यांच्या पालकांना होत असून, इतर प्रवासीसुद्धा यामध्ये अडकून पडत आहेत. या वाहतूक कोंडीविरोधात नवीन पनवेल येथील मनसे आक्रमक झाली असून, त्यांनी शाळा वाहतूक विभागाला वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विनंती केली आहे.

- शाळेच्या वेळात होतेय प्रचंड गर्दी
- विद्यार्थ्यांसह प्रवाशांचे होताहेत हाल

शाळा सुरू झाल्याने नवीन पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. जागा मिळेल तशी कुठेही व कोणत्याही ठिकाणी वाहने पार्क केली जात आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. मनसे विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष अनिकेत मोहिते व सचिन जाधव (वाहतूक चिटणीस) यांच्या नेतृत्वाखाली व पराग बालड यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित प्रशासनाला पत्र देऊन शाळेने सुरक्षा रक्षक ठेवून मुलांना सुरक्षित बाहेर काढावे व शाळेसमोर वाहतूक कर्मचाऱ्यांची नेमणूक करून वाहतूक कोंडी सोडवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी मंदार गोसावी (उपशहर अध्यक्ष मनविसे), शार्दूल थोपटे, किरण गावडे, सौरभ पाटोळे, प्रफुल्ल कांबळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

महत्त्वाचे

## सिंधू, श्रीकांतचे आव्हान संपुष्टात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कोरिया ओपन सुपर ५०० मधील भारताचे आव्हान संपुष्टात आले आहे. पीव्ही सिंधूला महिला एकेरीत पराभव पत्करावा लागला आहे. त्याचवेळी श्रीकांतला पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीतही पराभवाला सामोरे जावे लागले. शनिवारी खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीत दोन वेळच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या पीव्ही सिंधूचा दक्षिण कोरियाच्या आन सियोंगने १४-२१, १७-२१ असा पराभव केला. दुसरीकडे पुरुष गटात पुन्हा एकदा श्रीकांतला उपांत्य फेरीच्या पलीकडे प्रगती करता आली नाही. त्याचा ओंकि विजेत्या जोनाथन क्रिस्टीने ५० मिनिटांच्या लढतीत १९-२१, १६-२१ असा पराभव केला.

## विकास कामांचा धडाका

वेश्वी, वाडगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा प्रारंभ आ.जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी जि.प. सदस्या चित्रा पाटील, वेश्वीच्या आरती पाटील, प्रफुल्ल पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कबड्डी स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला.

### मनसे माथाडी कामगार चषक क्रिकेट स्पर्धा

## साई रामनगर संघाची बाजी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेना यांच्या वतीने येथील जोगेश्वरी नगरमधील मैदानावर दि. ८ व ९ एप्रिलला संपन्न झालेल्या मनसे माथाडी कामगार चषक २०२२ नाईट अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेत साई रामनगर, नागोठणे संघाने विजेतेपद मिळविले. तर, जय भवानी चिंचवली संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. देवालाई देवी, चिकणी व ओम सेवन स्टार कोळीवाडा यांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक मिळविला.

अंतिम सामन्यातील सामनावीर जीवन बेंडकुळे, मालिकाविर मनोज घरत, उत्कृष्ट फलंदाज महेंद्र अंधेरे, उत्कृष्ट गोलंदाज निखिल देवरे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक श्रीनंदन भिल्लारे यांनाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण राजेश उज्जनकर, राजन शितोळे यशवंत हाडगे, महेश पंडित, संजय गायकवाड, सुबोध जाधव, पंकज डोईफोडे व गणेश खंडारे या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

## चेन्नई पुन्हा पराभूत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या पंधराव्या हंगामातील १७ व्या सामन्यात चेन्नईला पुन्हा एकदा पराभवाला सामोरे जावे लागले असून, सनरायझर्स हैदराबादने आठ गडी राखून दणदणीत विजय मिळवला आहे. अभिषेक शर्माने दमदार फलंदाजी केल्यामुळे हैदराबादसाठी हा विजय सोपा झाला. शर्माने ७५ धावा केल्यामुळे चेन्नईने दिलेले १५४ धावांचे आव्हान हैदराबाद संघ सहज गाठू शकला. हैदरबादाचा या हंगामातील हा पहिला विजय असून, चेन्नई सुपर किंग्जला सलग चौथ्या सामन्यातदेखील पराभवाचा सामना करावा लागला आहे. १५४ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी हैदराबादला जास्त मेहनत घ्यावी लागली नाही.

### श्रीराम मंडळ आयोजित कबड्डी स्पर्धा

## गणेश दिवलांग अंतिम विजेता

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत शहाबाज हद्दीतील कमळपाडा गावात राम जन्मोत्सवानिमित्त शनिवार, दि ९ एप्रिल रोजी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पेझारीच्या गणेश दिवलांग संघाने मरीदेवी धेरंड संघावर मात करीत चषकावर नाव कोरले.

या स्पर्धेत एकूण २४ संघांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील २३ तर उरण तालुक्यातील एका संघाचा सहभाग होता. स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक मच्छिंद्रनाथ पाटील व ग्रुप ग्रामपंचायत सरपंच धनंजय म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या सामन्यात निरीक्षक म्हणून जनार्दन पाटील यांनी काम पाहिले. यावेळी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष संदेश बैकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक श्री गणेश दिवलांग रुपये पंधरा हजार, द्वितीय क्रमांक मरीदेवी धेरंड दहा हजार, श्री भैरवनाथ पेझारी तृतीय क्रमांक सात हजार, तर चतुर्थ क्रमांक सात हजार नवकिरण भेडखल तर अनुक्रमे विजयी झालेल्या संघांना मंडळाच्या वतीने सन्मानचिन्हे देण्यात आली. ही सर्व बक्षिसे श्री राम मंडळाचे अध्यक्ष महादेव टेमकर, उपाध्यक्ष द्वारकानाथ पाटील, सचिव भारत बैकर, तसेच मच्छिंद्रनाथ पाटील, अशोक पाटील यांच्या हस्ते देण्यात आली. या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई ऋतिक पाटील, उत्कृष्ट खेळाडू अमीर धुमाळ, पब्लिक हिरो सिद्धार्थ ठाकूर, मेन ऑफ मॅच पार्थ ठाकूर आदींना भेटवस्तू देण्यात आल्या. मंडळाचे पदाधिकारी व सर्व सभासदांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

या स्पर्धेतील सर्व सामन्यांचे सूत्रसंचालन मनोहर टेमकर यांनी केले. विशेष म्हणजे, या स्पर्धेत पंचांचे काम गावातील तरुण मंडळींनी चोखपणे बजावले.

## वॉर्नरची तडाखेबाज खेळी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या पंधराव्या हंगामातील कोलकाता आणि दिल्ली कॅपिट्लस यांच्यातील सामन्याला चांगलीच रंगत चढलीय. या सामन्यात अगोदर फलंदाजीसाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्सने तुफान फटकेबाजी करत केकेआरच्या गोलंदाजांना घाम फोडला. सलामीला आलेल्या डेव्हिड वॉर्नरने तर चौकार आणि षटकार लगावत या हंगामातील पहिले अर्धशतक झळकावले आहे. विशेष म्हणजे, या सामन्यात डेविड वॉर्नरने मोठा विक्रम नोंदवला असून, आयपीएलच्या इतिहासात तो सर्वाधिक अर्धशतक झळकावणारा फलंदाज ठरला आहे. त्याच्या या खेळीमुळेच दिल्लीला २१५ धावांपर्यंत मजल मारता आली.

नाणएफेक जिंकल्यानंतर दिल्ली कॅपिट्लसकडून डेव्हिड वॉर्नर आणि पृथ्वी शॉ या सलामीच्या जोडीने मोठी फटकेबाजी करत आपला जम बसवला. दोघांनही नऊ षटकांमध्ये ९३ धावांची भागिदारी केली. त्यानंतर नवव्या षटकात पृथ्वी शॉ अर्धशतकी खेळी करत ५१ धावांवर बाद झाला.

## कबड्डी स्पर्धेत स्वयंभू हनुमान चिवे विजयी

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

जय हनुमान क्रीडा मंडळ रासळ आणि सुधागड तालुका कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे ९ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत ३२ संघांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेतील अंतिम सामना स्वयंभू हनुमान चिवे व ओम कालभैरव आपटवणे दोन संघांमध्ये झाला. या अटीतटीच्या अंतिम लढतीत चिवे हा संघ विजय झाला. या

स्पर्धेतील प्रथम क्रमांक चिवे या संघास रोख रक्कम १५ हजार व चषक, द्वितीय क्रमांक कालभैरव आपटवणे १० हजार व चषक, तृतीय क्रमांक भैरवनाथ वावे ५ हजार व चषक, चतुर्थ क्रमांक कालभैरव भार्जे ५ हजार व चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू स्वप्निल भिलारे वावे, उत्कृष्ट चढाई करणारा समाधान मोरे आपटवणे तर उत्कृष्ट पक्कड निलेश सकपाळ वावे यांना आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे बक्षीस वितरण जय हनुमान क्रीडामंडळ रासळचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मंडळाच्या हस्ते देण्यात आले.

## बंगळुरुचा मुंबईवर रॉयल विजय

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या पंधराव्या हंगामातील १८ वा सामना चांगलाच रोमहर्षक ठरला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाने मुंबई इंडियन्सवर सात गडी राखून दणदणीत विजय मिळवला आहे. मुंबईने दिलेल्या १५१ धावांचे लक्ष्य रॉयल चॅलेजर्स बंगळुरुने आठ गडी राखून गाठले. मुंबईला मोठ्या धावसंख्येपर्यंत घेऊन जाण्यासाठी सूर्यकुमार यादवने मोठी मेहनत घेतली. मात्र, बंगळुरुने मुंबईला नमवत विजय मिळविला.

मुंबईने दिलेले १५२ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी बंगळुरुच्या फलंदाजांनी सुरुवातीपासून मोठे फटके मारायला सुरुवात केली होती. सलामीला आलेले फाफ डू प्लेलीस आणि अनुज रावत या जोडीने ५० धावांची भागिदारी केली. त्यानंतर नवव्या षटकामध्ये फाफ डू प्लेलिस उनाडकटने टाकलेल्या चेंडूचा सामना करताना झेलबाद झाला. फाफ डू प्लेलिसने २४ चेंडूंमध्ये १६ धावा केल्या. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या विराट कोहलीने चांगली फलंदाजी केली. अनुज रावतने ४७ चेंडूंमध्ये ६ षटकार आणि २ चौकार लगावत ६६ धावा केल्या. तर विराट कोहलीनेही ३६ चेंडूंमध्ये ५ चौकारच्या जोरावर ४८ धावा केल्या. या दोघांच्या फटकेबाजीमुळे बंगळुरुचा विजय आणखी सोपा झाला.

## दीपिका पल्लीकलची सुवर्ण कामगिरी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिनेश कार्तिकची पत्नी दीपिका पल्लिकलही क्रीडाक्षेत्रात उत्तम कामगिरी करत आहे. दीपिका पल्लिकलनं 'वर्ल्ड डबल्स स्कॉश' स्पर्धेत पुनरागमन केलं. तसंच, पहिल्याच स्पर्धेत तिनं दोन सुवर्ण पदके पटकावली आहेत.

दीपिकानं जुळ्या मुलांना जन्म दिल्यानंतर ६ महिन्यांपेक्षा कमी कालावधीमध्ये वर्ल्ड डबल्स स्कॉश स्पर्धेत पुनरागमन केलं. पुनरागमनानंतरच्या पहिल्याच स्पर्धेत तिनं २ गोल्ड मेडल पटकावली आहेत. तिने सौरव घोषालसोबत पहिल्यांदा

मिक्स डबल्स स्पर्धेचं विजेतेपद पटाकवलं. भारताच्या या जोडीनं इंग्लंडच्या एड्रियन वालर आणि एलिसन वाटर्स या जोडीचा ११-६, ११-८ असा सरळ पराभव केला.

दीपिका पल्लिकलनं ऑक्टोबर २०१८ नंतर पहिल्यांदाच एखाद्या स्पर्धेत भाग घेतला होता. पुनरागमनानंतर दीपिकानं मिक्स डबल्स स्पर्धा जिंकल्यानंतर दीड तासांमध्येच महिला डबल्स स्पर्धेतही गोल्ड मेडल पटकावले. दीपिकानं जोशना चिनप्पाच्या मदतीनं इंग्लंडच्या सारा जेन आणि एलिसन वाटार्स जोडीचा पराभव केला. ही मॅच चांगलीच रंगतदार झाली.

इंग्लंडच्या जोडीनं भारतीय खेळाडूंसमोर तगडं आव्हान उभं केलं होतं. अखेर दीपिका-जोशला जोडीनं निर्णायक क्षणी खेळ उंचावत फायनलमध्ये ११-९, ४-११, ११-८ असा विजय मिळवला.

## भारतीय महिला उपांत्य फेरीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सलिमा टेटेच्या नेतृत्वात भारतीय महिला संघाने उपांत्यपूर्व सामन्यात दोन वेळच्या चॅम्पियन कोरियाला धूळ चारत ३-० ने सनसनाटी विजयाची नोंद केली. यासह २०१३ मधील कांस्यपदक विजेता भारतीय युवा महिला संघ नऊ वर्षांनंतर विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत दाखल झाला आहे. तसेच वर्ल्डकपच्या उपांत्य फेरीचा प्रवेश निश्चित करणारा भारत हा पहिला महिला युवा संघ ठरला.

भारतीय संघाकडून गोलरक्षक खुशबूच्या सर्वोत्तम कामगिरीसमोर बलाढ्य दक्षिण कोरियाचे खेळाडू फ्लॉप ठरले.

त्यामुळे शेवटच्या मिनिटांपर्यंत कोरियाला एकही गोल करता आला नाही.

फॉर्मात असलेली फॉरवर्ड मुमताज खान (११ वा मि.), लालरिंदिकी (१५ वा मि.), संगीता कुमारी (४१ वा मि.) यांनी आपल्या सर्वोत्तम खेळीतून भारतीय युवा महिला संघाचा विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील प्रवेश निश्चित केला. याच खेळीच्या बळावर भारतीय महिला संघाने एफआयएचच्या ज्युनियर वर्ल्डकपची सेमीफायनल गाठली. भारतीय संघाची युवा खेळाडू मुमताजने स्पर्धेत आपला दबदबा निर्माण केला. तिने आतापर्यंत झालेल्या चार सामन्यांत ६ गोल केले आहे. यातून ती सध्या वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक गोल करणारी तिसरी भारतीय खेळाडू ठरली.

## सोशल मीडियावर रामनवमीचा जल्लोष

**। वर्षा मेहता । । अलिबाग ।**

रामनवमी हा भगवान विष्णूचा अवतार असलेल्या प्रभू रामाच्या जन्माचा उत्सव म्हणून ओळखला जातो. असा विश्वास आहे, की त्यांचा जन्म चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला झाला होता. यंदा तो १० एप्रिल रोजी साजरा केला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या. देशवासियांना रामनवमीच्या हार्दिक शुभेच्छा. प्रभू श्रीरामाच्या कृपेने सर्वांना जीवनात सुख, शांती आणि समृद्धी लाभो. जय श्री राम!, पंतप्रधान मोदींनी हिंदीत ट्विट केले.

हॅशटॅग हॅपी रामनवमी ट्रेंड

SOCIAL MEDIA पडसाद

दोन वर्षांपासून कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव पाहता प्रभू श्रीरामाची जयंती भव्य पद्धतीने साजरी होऊ शकली नाही. मात्र, यावेळी रामजन्मभूमी संकुलात भगवान श्रीरामाची जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली. रामनवमी २०२२ च्या निमित्ताने अयोध्येतील राम मंदिरात प्रभू रामाचा आशीर्वाद घेण्यासाठी भक्त गाताना आणि नाचताना दिसले. अनेकांनी सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडिओ शेअर केले व एकमेकांना या सणाच्या शुभेच्छा दिल्या. याव्यतिरिक्त हॅशटॅग ब्रह्मास्त्र ट्रेंड झाले. बहुप्रतीक्षित चित्रपट 'ब्रह्मास्त्र'चा पोस्टर प्रदर्शित करण्यात आला.

## बीसीसीआयला बक्षिसाची रक्कम देण्याचा विसर

### सात कोटींची बक्षिसे दिलीच नाहीत

### तिजोरी भरण्याकडे लक्ष केंद्रित; घोषणांकडे दुर्लक्ष

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय युवा संघाने ५ फेब्रुवारी रोजी आयसीसीचा १९ वर्षांखालील विश्वचषक पटकावला होता. त्यानंतर बीसीसीआयने विश्वविजेत्या भारतीय युवा संघातील खेळाडूंना प्रत्येकी ४० लाख देण्याची घोषणा केली होती. मात्र, तब्बल ६५ दिवसांनंतरही अद्याप बीसीसीआयने या विश्वविजेत्या संघाच्या युवा शिलेदारांना कोणत्याही प्रकारचे बक्षिसाच्या स्वरूपातील पैसे दिले नाहीत. याच ६५ दिवसांदरम्यान बीसीसीआयने आयपीएलच्या माध्यमातून जवळपास ७ हजार ८०० कोटींची कमाई केली आहे. मात्र, बोर्डाला घोषणा केलेल्या एकूण ६ कोटी ८० लाखांचे बक्षीस देण्याचा विसर पडला आहे. युवा खेळाडू सध्या याच बक्षिसांच्या रकमेसाठी वेट अँड वॉच करत आहेत. त्यांच्या पदरात निराशा पडली आहे.

जगातील सर्वात श्रीमंत मानले जाणाऱ्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सध्या कोट्यवधींची कमाई करून आपली तिजोरी भरण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे बीसीसीआय केलेल्या घोषणांकडे वेळोवेळी कानाडोळा करत आहे. मात्र, ज्या खेळाडूंच्या बळावर बीसीसीआयला जागतिक स्तरावर आपला दबदबा निर्माण करता आला, त्याच खेळाडूंकडे दुर्लक्ष होत आहे.

भारतीय युवा संघाने फायनलमध्ये इंग्लंडवर ५ गड्यांनी विजय संपादन केला. यासह भारतीय संघ पाचव्यांदा विश्वविजेता ठरला होता. या संघाचे कौतुक करताना अध्यक्ष सौरव गांगुली आणि सचिव जय शहा यांनी बक्षीस देण्याची घोषणा केली होती.

### १५ महिन्यांनंतर मिळाली बक्षिसाची रक्कम

**बीसीसीआयवर घोषणा करूनही बक्षिसाचे पैसे देत नसल्याचा ठपका आहे. याचाच मोठा फटका महिला संघ, देशांतर्गत स्पर्धेतील रणजी ट्रॉफी, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी, विजय हजारे चषक विजेत्या खेळाडूंना बसला आहे. भारतीय महिला संघाने २०२० मधील टी-२० विश्वचषक स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले होते. मात्र, या टीमला १५ महिन्यांनंतर बीसीसीआयने बक्षिसाच्या स्वरूपातील रक्कम दिली. यासाठी महिला खेळाडूंना मोठी प्रतीक्षा करावी लागली.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)